राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०१६
परीक्षा दि. २६ सप्टेंबर, २०१६

**A**

2016

CODE : **HO8**

प्रश्नपुस्तिका क्रमांक

**BOOKLET NO.**

# प्रश्नपुस्तिका

## सामान्य अध्ययन IV

**वेळ : 2 ( दोन ) तास**

**एकूण प्रश्न : 150**

**एकूण गुण : 150**

# सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ↑ केंद्राची संकेताक्षरे | | | | | | ↑ शेवटचा अंक | |

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक तीन चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

1. भारतातील दारिद्र्य संकल्पनेचा किमान उष्मांकाशी संबंध कोणी जोडला आहे ?

(1) पी.के. बर्धन (2) डॉ. मॉन्टेकसिंग अहलुवालिया

(3) दांडेकर व रथ (4) बी.एस. मिन्हास

Who of the following has correlated poverty with calories in India ?

(1) P.K. Bardhan (2) Dr. Monteksingh Ahaluwalia

(3) Dandekar and Rath (4) B.S. Minhas

---

2. **योग्य** पर्याय निवडा.

परकीय भांडवलाचे प्रकारात कोणत्या गोष्टीचा समावेश होतो ?

(a) प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक

(b) विदेशी संयुक्त गुंतवणूक

(c) आंतरसरकारी कर्जे

(d) आंतरराष्ट्रीय संस्थांकडील कर्जे

(e) बहिर्गत व्यापारी कर्जे

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरीलपैकी सर्व (2) वरीलपैकी कोणतेही नाही

(3) (a), (b) व (c) (4) केवळ (d) व (e)

Choose **correct** option :

What does foreign capital include ?

(a) Direct foreign investment

(b) Foreign collaboration investment

(c) Inter-Government loans

(d) Loans from international institutions

(e) External commercial borrowings

**Answer options :**

(1) All of the above (2) None of the above

(3) (a), (b) and (c) (4) Only (d) and (e)

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

3. खालीलपैकी कोणत्या बाबींचा सहकाराची आधुनिक तत्वे म्हणून विचार केला जातो ?

(a) ऐच्छिक आणि खुले सभासदत्त्व

(b) अधिक नफेखोरी

(c) लोकशाहीवर आधारित व्यवस्थापन

(d) आंतरराष्ट्रीय सहकार्य

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (c) (2) (a) आणि (b) (3) (b) आणि (c) (4) (b) आणि (d)

Which of the following are considered as the latest principles of co-operation ?

(a) Voluntary and open membership

(b) Maximum profit

(c) Democratic management

(d) International co-operation

**Answer options :**

(1) (a) and (c) (2) (a) and (b) (3) (b) and (c) (4) (b) and (d)

**4.** जोड्या जुळवून **योग्य** पर्याय निवडा.

जागतिक व्यापार संघटनेच्या मंत्रीस्तरीय परिषदा :

| | **परिषदेचे ठिकाण** | | **भारताचे प्रतिनिधीत्व** |
|---|---|---|---|
| (a) | सिंगापूर (1996) | (i) | रामकृष्ण हेगडे |
| (b) | जिनेव्हा (1998) | (ii) | मुरासोली मारन |
| (c) | सिॲटल (1999) | (iii) | अरूण जेटली |
| (d) | कॅनकुन (2003) | (iv) | कमलनाथ |
| (e) | हाँगकाँग (2004) | (v) | रामय्या |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) | (e) |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (i) | (iii) | (v) | (ii) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) | (v) |
| (3) | (ii) | (i) | (iv) | (iii) | (v) |
| (4) | (v) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

Match the following and choose the **correct** code.

Minister level conferences of WTO :

| | **Conference Venue** | | **Indian Representative** |
|---|---|---|---|
| (a) | Singapore (1996) | (i) | Ramkrishna Hegde |
| (b) | Geneva (1998) | (ii) | Murasoli Maran |
| (c) | Ciatal (1999) | (iii) | Arun Jetley |
| (d) | Cancun (2003) | (iv) | Kamal Nath |
| (e) | Hongkong (2004) | (v) | Ramaiyyah |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) | (e) |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (i) | (iii) | (v) | (ii) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) | (v) |
| (3) | (ii) | (i) | (iv) | (iii) | (v) |
| (4) | (v) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

5. भारतातील मोठ्या उद्योगांचे सहायक उद्योग म्हणून लघुउद्योगांचा विकास करण्याचा भर कोणत्या औद्योगिक धोरणाने देण्यात आला ?

(1) 1991 चे औद्योगिक धोरण (2) 1948 चे औद्योगिक धोरण

(3) 1956 चे औद्योगिक धोरण (4) 1977 चे औद्योगिक धोरण

Which Industrial Policy in India promoted small-scale industry as ancilliary to facilitate major industry ?

(1) Industrial Policy of 1991 (2) Industrial Policy of 1948

(3) Industrial Policy of 1956 (4) Industrial Policy of 1977

---

6. जागतिकीकरणामुळे घडून येत असलेल्या बदलासंदर्भात खालीलपैकी कोणते/ती विधान/विधाने **बरोबर** आहे/आहेत ?

(a) भारताच्या आर्थिक विकासात बहुराष्ट्रीय कंपन्या निश्चीत आणि महत्वपूर्ण भूमिका बजावणार आहेत.

(b) भारतीय कंपन्यांचे भागभांडवल युरोपच्या रोखे बाजारात (stock market) व्यवहारासाठी उपलब्ध केले जात आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) दोन्ही (4) एकही नाही

In connection with emerging trends in era of globalization, which of the following statement/s is/are **correct** ?

(a) MNC's have now a definite and unique role in the sustained economic development of India.

(b) Indian companies shares are being traded in European stock market.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

7. खालील विधाने विचारात घ्या.

(a) जागतिक बँक प्रकल्प अभिमुख मदत आणि उपक्रमभिमुख मदत देते.

(b) 1960 मध्ये आंतरराष्ट्रीय विकास संस्थेची स्थापना झाली.

(c) आंतरराष्ट्रीय विकास संस्था जगातील गरीब देशांना व्याजमुक्त मदत देते.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) फक्त (a) (2) (b) व (c) (3) (a) व (b) (4) सर्व बरोबर

Consider the following statements :

(a) The world bank gives project oriented aid and program oriented aid.

(b) The International Development Agency was established in 1960.

(c) The International Development Agency gives interest free aid to the world's poorest countries.

Which of the statement/s given above is/are **correct** ?

(1) Only (a) (2) (b) and (c) (3) (a) and (b) (4) All above

---

8. खालील विधाने विचारात घ्या.

(a) 1966 मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी संघाच्या परिषदेने सहकारांतर्गत सहकार हेच नवीन तत्व स्वीकारले.

(b) 1966 मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी संघाच्या परिषदेने भांडवलावर मर्यादीत व्याज हे नवीन तत्व स्वीकारले आहे.

(c) 1995 मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी संघाने समाजाबद्दलचे कर्तव्य हे नवीन सहकाराचे तत्व म्हणून स्वीकारले.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) (a) व (c) (2) (a) व (b)

(3) (b) व (c) (4) सर्व बरोबर

Consider the following statements :

(a) The International Co-operative Alliance adopted new principle co-operation amongst co-operation in 1966.

(b) The International Co-operative Alliance adopted new principle - Limited interest on capital in 1966.

(c) The International Co-operative Alliance adopted new principle duties for the community in 1995.

Which of the above statement/s is/are **correct** ?

(1) (a) and (c) (2) (a) and (b)

(3) (b) and (c) (4) All of the above

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

9. मानव विकास निर्देशांक मापनात खालीलपैकी कोणत्या निर्देशकाचा वापर होत **नाही** ?

(1) साक्षरता दर (2) दरडोई स्थुल देशांतर्गत उत्पन्न

(3) जन्माच्यावेळी जगण्याचा दर (4) कृषि उत्पादकता

Which of the following indicator is **not** used in the calculation of Human Development Index ?

(1) Literacy rate (2) GDP per capita

(3) IMR (4) Agricultural Productivity

---

10. खालील विधाने विचारात घ्या.

(a) सरकारने एम. नरसिंहम यांच्या अध्यक्षतेखाली बँकिंग क्षेत्र सुधारणा समितीची नियुक्ती केली.

(b) समितीने आपला अहवाल सरकारला एप्रिल, 2000 मध्ये सादर केला.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **सत्य** आहे/त ?

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) व (b) (4) यापैकी नाही

Consider the following statements :

(a) The Government appointed the committee on banking sector reforms under the Chairmanship of M. Narasimham.

(b) The committee submitted it's report to the Government in April, 2000.

Which of the statement/s is/are **correct** ?

(1) Only (a) (2) Only (b) (3) (a) and (b) (4) None of these

---

11. इंदिरा आवास योजना प्रामुख्याने कोणत्या प्रकारच्या गृह निर्मितीस प्रोत्साहन देते ?

(1) शहरी गृहनिर्माण (2) आदिवासी (Tribal) गृहनिर्माण

(3) ग्रामीण गृहनिर्माण (4) ग्रामीण व शहरी गृहनिर्माण

What does Indira Awaas Yojana basically promotes ?

(1) Urban Housing (2) Tribal Housing

(3) Rural Housing (4) Rural and Urban Housing

---

12. सहकारी तत्त्वावरील विपणनात खालीलपैकी कोणती राज्ये अग्रेसर आहेत ?

(1) मध्य प्रदेश, उत्तराखंड आणि आसाम

(2) महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू

(3) जम्मू काश्मिर, हिमाचल प्रदेश आणि आसाम

(4) झारखंड, मध्य प्रदेश आणि अरुणाचल प्रदेश

Which of the following states are leading in co-operative marketing ?

(1) Madhya Pradesh, Uttarakhand and Assam

(2) Maharashtra, Andhra Pradesh and Tamil Nadu

(3) Jammu Kashmir, Himachal Pradesh and Assam

(4) Jharkhand, Madhya Pradesh and Arunachal Pradesh

---

13. भारतात औद्योगिक विकासासाठी उद्योग (विकास व नियमन) कायदा कधी करण्यात आला ?

(1) 1948 (2) 1951 (3) 1969 (4) 1973

For the Industrial development of India, when the Industry (Development and Regulation) Act was incepted ?

(1) 1948 (2) 1951 (3) 1969 (4) 1973

---

14. खालील विधाने विचारात घ्या.

(a) 2009 मध्ये छोट्या आकाराच्या L.P.G. वितरण संस्थेसाठी राजीव गांधी ग्रामीण एल.पी.जी. वितरण योजना सुरू केली.

(b) 2010 मध्ये सरकारने राष्ट्रीय टेलिकॉम धोरणाला मान्यता दिली.

(c) सरकारने सप्टेंबर 2012 मध्ये राज्य वितरण कंपनीचे पुर्नरचना वित्तसाठीच्या योजनेला मान्यता दिली.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **चुकीचे** आहे/त ?

(1) फक्त (b) (2) (a) व (b) (3) फक्त (a) (4) यापैकी नाही

Consider the following statements :

(a) The Rajiv Gandhi Gramin L.P.G. Vitaran Yojana for small - size L.P.G. distribution agencies has been launched in 2009.

(b) The Government approved National Telecom Policy (NTP) in 2010.

(c) The Government in September 2012 approved the scheme for Finance Restructuring of state distribution companies.

Which of the statements given is/are **incorrect** ?

(1) Only (b) (2) (a) and (b) (3) Only (a) (4) None of these

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

15. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ (MSSIDC) खालीलपैकी कोणत्या क्षेत्रात कार्य करते ?

(a) जमीन खरेदीसाठी दीर्घकालीन वित्तपुरवठा.

(b) आयात निर्यातीसाठी लघुउद्योगांना सहाय्य करणे.

(c) प्रदर्शने आयोजित करणे.

(d) यंत्रसामग्री खरेदीसाठी वित्तपुरवठा करणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) (2) (b) आणि (c) (3) (b) आणि (d) (4) वरील सर्व

Maharashtra Small Scale Industries Development Corporation (MSSIDC) functions in which of the following areas ?

(a) Long term finance for purchasing of land.

(b) To assist SSI for import and export.

(c) To arrange exhibitions.

(d) To finance for the purchasing of machinery and equipment.

**Answer options :**

(1) (a) and (b) (2) (b) and (c) (3) (b) and (d) (4) All above

16. परिणामकारक वाहतूक व्यवस्था ही –

(a) इंधन वाचवते.

(b) वेळ वाचवते.

(c) उत्पादकता वाढवण्यास मदत करते.

(d) आर्थिक वृद्धीस मदत करते.

**अचूक** पर्याय निवडा :

(1) (a) व (b) (2) (b) व (c) (3) (c) व (d) (4) वरील सर्व

Effective transport system is :

(a) Helpful in saving fuel.

(b) Helpful in saving time.

(c) Helpful in enhancing productivity.

(d) Helpful in enhancing economic growth.

Select **correct** options :

(1) (a) and (b) (2) (b) and (c) (3) (c) and (d) (4) All above

---

17. रस्ते वाहतूकीच्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे ?

(a) रस्ते वाहतूकीमुळे हवा आणि आवाजाचे प्रदूषण वाढते.

(b) भारतात रस्ते वाहतूकीची व्याप्ती मर्यादीत आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) दोन्ही (4) कोणतेही नाही

With reference to road transport, which of the following statements is **correct** ?

(a) Road transport adds to air and noise pollution.

(b) Road transport has limited scope in India.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

18. जोड्या जुळवून **योग्य** पर्याय निवडा.

| | **कामाचे स्वरूप** | | **संपर्क माध्यमे** |
|---|---|---|---|
| (a) | मृदा, जलसंधारण व रस्ते | (i) | ग्राम सेवक व गटविकास अधिकारी |
| (b) | जवाहर विहीर | (ii) | कृषि सहायक व तालुका कृषि अधिकारी |
| (c) | फळबागा | (iii) | सहायक लागवड अधिकारी व लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण |
| (d) | वृक्ष लागवड | (iv) | सहसंचालक, रेशीम उद्योग |
| (e) | रेशीम उत्पादन | (v) | ग्रामसेवक, तलाठी व तहसीलदार |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) | (e) |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iv) | (v) | (iii) |
| (2) | (iv) | (ii) | (i) | (iii) | (v) |
| (3) | (v) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) | (v) |

Match the following and find **correct** code.

| | **Nature of work** | | **Communication channel** |
|---|---|---|---|
| (a) | Soil, Water conservation and Road | (i) | Gram Sevak and BDO |
| (b) | Jawahar well | (ii) | Agricultural Assistant and Taluka Agriculture Officer |
| (c) | Horticulture | (iii) | Assistant Plantation officer and Plantation Officer, Social forestry |
| (d) | Tree Plantation | (iv) | Joint Director of Silk Production |
| (e) | Silk Production | (v) | Gram Sevak, Talathi and Tahsildar |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) | (e) |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iv) | (v) | (iii) |
| (2) | (iv) | (ii) | (i) | (iii) | (v) |
| (3) | (v) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) | (v) |

19. पुढील विधानांचा विचार करा :

आश्वासित रोजगार योजना - 1993 च्या संदर्भात :

**विधान (I) :** हंगामी बेरोजगारी दुर करण्यासाठी ग्रामीण भागात रहिवासी ठिकाणीच 100 दिवस अकुशल शारीरिक रोजगार उपलब्ध करणे.

**विधान (II) :** टिकाऊ सामुदायिक, सामाजिक व आर्थिक मालमत्ता निर्माण करून भविष्यात रोजगाराची शक्यता निर्माण करणे.

**आता सांगा :**

(1) विधान **(I)** बरोबर, विधान **(II)** चूक

(2) विधान **(II)** बरोबर, विधान **(I)** चूक

(3) दोन्ही विधाने बरोबर

(4) दोन्ही विधाने चूक

Consider the following statements :

In the context of employment assurance scheme - 1993 :

**Statement (I) :** For eradicating seasonal unemployment, unskilled physical labour employment is to be made available for 100 days in rural area.

**Statement (II) :** Creating future employability by creating permanent collective social and economic assets.

**State :**

(1) Statement **(I)** is correct, **(II)** incorrect

(2) Statement **(II)** is correct, **(I)** incorrect

(3) Both statements are correct

(4) Both statements are incorrect

20. खालील विधाने विचारात घ्या.

(a) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी सुधारणा अभियान 3 डिसेंबर, 2005 रोजी सुरू झाले.

(b) अभियानाअंतर्गत शहरातील पायाभूत सेवांच्या एकात्मक विकासावर भर देण्यात आला.

(c) शहरी आणि ग्रामीण पायाभूत सुविधा सुधारणा कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे हे या अभियानात स्वीकारले.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **सत्य** आहे/त ?

(1) (a) व (c) (2) (b) व (c) (3) (a) व (b) (4) फक्त (b)

Consider the following statements :

(a) Jawaharlal Nehru National Urban Renewal Mission has been launched on 3rd December, 2005.

(b) Focus attention on integrated development of infrastructural services in the cities covered under the mission.

(c) Mission mode approach was adopted for implementation of Urban and Rural infrastructure improvement programme.

Which of the statement/s given above is/are **correct** ?

(1) (a) and (c) (2) (b) and (c) (3) (a) and (b) (4) Only (b)

21. **योग्य** पर्याय निवडा.

संदेश वहनातील अत्याधुनिक साधनात पुढीलपैकी कोणत्या घटकाचा समावेश होत नाही ?

(a) सेल्युलर मोबाईल टेलिफोन सेवा

(b) व्हॉइसमेल सेवा

(c) पेजर सेवा

(d) पोस्ट व तार सेवा

(e) वर्तमानपत्र

(f) सॅटेलाइट फोन सेवा

(g) ई-मेल सेवा

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b)	(2) (c) व (g)

(3) (d) व (e)	(4) वरीलपैकी कोणतेही नाही

Choose **correct** option :

Which of the following ultra - modern communication technology does not include ?

(a) Cellular Mobile Telephone Service

(b) Voicemail Service

(c) Pager Service

(d) Post and Telegram Service

(e) Newspaper

(f) Satellite Phone Service

(g) E-mail Service

**Answer options :**

(1) (a) and (b)	(2) (c) and (g)

(3) (d) and (e)	(4) None of the above

**22.** खालील विधाने विचारात घ्या :

(a) 2001 मध्ये 10 दशलक्ष रोजगार संधी ध्येय गाठण्यासाठी नियोजन मंडळाने एस.पी. गुप्ता विशेष गटाची स्थापना केली.

(b) सन 2011-12 मध्ये शेती क्षेत्रात अंदाजे 80% सर्व प्रकाराचा रोजगार देण्यात येईल.

(c) 11 व्या योजनेत जवळपास 52 दशलक्ष श्रमशक्तीतील वाढ अपेक्षीत आहे.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) (a) व (b) (2) (a) व (c) (3) (b) व (c) (4) फक्त (b)

Consider the following statements :

(a) The planning commission appointed the S.P. Gupta Special Group on Targeting Ten Million Employment Opportunities in 2001.

(b) Agriculture sector will provided about 80% of all jobs by the year 2011-12.

(c) The labour force is expected to increase by about 52 million during the 11$^{th}$ plan.

Which of the statement/s given above is/are **correct** ?

(1) (a) and (b) (2) (a) and (c) (3) (b) and (c) (4) Only (b)

---

**23.** खालीलपैकी कोणते/ती विधान/विधाने **बरोबर** आहे/आहेत ?

(a) 1904 चा सहकार कायदा स्व-मदत आणि सहकार्याची भावना वाढीस लावण्याच्या उद्देशाने संमत करण्यात आला होता.

(b) 1904 चा मध्यवर्ती कायदा अजूनही भारतीय सहकार विषयक कायद्याचा आधार मानला जातो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) दोन्ही (4) कोणतेही नाही

Which of the following two statements is/are **correct** ?

(a) The co-operative Act of 1904 was passed to encourage self-help and co-operation.

(b) The Act of 1904 is still the basis of co-operative legislation in India.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

24. भारतात औद्योगिक उत्पादन पातळी खालीलपैकी कोणत्या संख्याशास्त्रीय संकल्पनेतून व्यक्त होते ?

(1) केंद्रीय सांख्यिकी संस्था (CSO)

(2) प्रमाणित औद्योगिक वर्गीकरण (SIC)

(3) औद्योगिक उत्पादन निर्देशांक (IIP)

(4) किंमत निर्देशांक (PI)

Which one of the following statistical concept expresses the level of Industrial production in India ?

(1) Central Statistical Organisation (CSO)

(2) Standard Industrial Classification (SIC)

(3) Index of Industrial Production (IIP)

(4) Price Index (PI)

---

25. 'आर्थिक सुधारणा' या संकल्पनेअंतर्गत अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक तडजोडी कोणत्या आहेत ?

(a) आयात व निर्यातीवरील निर्बंध कमी करणे.

(b) राजकोषीय तूट कमी करणे.

(c) मोठ्या शहरांमधेच गुंतवणूक करणे.

(d) परदेशी बँकानाही वित्तीय बाजारपेठ खुली करणे.

**योग्य** पर्याय निवडा :

(1) वरील सर्व (2) (a), (b) आणि (c) (3) (a), (b) आणि (d) (4) (b), (c) आणि (d)

Which of the following are structural adjustments in the economy under economic reforms ?

(a) To reduce import - export restrictions

(b) To reduce fiscal deficit

(c) To invest in big cities only

(d) To open financial markets for foreign banks

Select **correct** options :

(1) All above (2) (a), (b) and (c) (3) (a), (b) and (d) (4) (b), (c) and (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

26. जोड्या जुळवून **योग्य** पर्याय शोधा :

| | **योजना** | | **उद्दिष्ट्य** |
|---|---|---|---|
| (a) | पहिली पंचवार्षिक योजना | (i) | जलद औद्योगीकरण |
| (b) | दुसरी पंचवार्षिक योजना | (ii) | जीवनमानाचा दर्जा उंचावणे |
| (c) | पाचवी पंचवार्षिक योजना | (iii) | शेतीला प्राधान्य |
| (d) | दहावी पंचवार्षिक योजना | (iv) | गरीबी हटाव |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (2) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (3) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (4) | (iii) | (iv) | (i) | (ii) |

Match the following and choose the **correct** code :

| | **Plan** | | **Objective** |
|---|---|---|---|
| (a) | First Five Year Plan | (i) | Rapid industrialisation |
| (b) | Second Five Year Plan | (ii) | Improvement in 'quality of life' |
| (c) | Fifth Five Year Plan | (iii) | Top Priority to agriculture |
| (d) | Tenth Five Year Plan | (iv) | Garibi Hatao |

**Answer options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (2) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (3) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (4) | (iii) | (iv) | (i) | (ii) |

27. लघुउद्योगाला खालीलपैकी कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते ?

(a) कालबाह्य यंत्रसामग्री

(b) कार्यक्षम व्यवस्थापन

(c) अपूरे वित्त

(d) स्पर्धेचा अभाव

**पर्यायी उत्तरे :**

(1) (b) आणि (d) (2) (a) आणि (b) (3) (c) आणि (d) (4) (a) आणि (c)

Which of the following are the problems faced by small-scale industries ?

(a) Out-dated technology

(b) Efficient management

(c) Lack of finance

(d) Lack of competition

**Answer options :**

(1) (b) and (d) (2) (a) and (b) (3) (c) and (d) (4) (a) and (c)

---

28. खालील विधाने विचारात घ्या.

(a) राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळाची स्थापना 1955 मध्ये झाली.

(b) या महामंडळाचा मुख्य उद्देश लघु उद्योगांना यंत्रे पुरवणे हा आहे.

(c) जिल्हा उद्योग केंद्र कार्यक्रमाची सुरुवात मे, 1979 मध्ये झाली.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **सत्य** आहे/त ?

(1) (a) व (b) (2) (b) व (c) (3) (a) व (c) (4) सर्व सत्य

Consider the following statements :

(a) National Small Industries Corporation was set up in 1955.

(b) The main objective of it's that to provide machinery to small scale units.

(c) The programme of District Industries Center was introduced in May, 1979.

Which of the statement/s given above is/are **correct** ?

(1) (a) and (b) (2) (b) and (c) (3) (a) and (c) (4) All of these

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

29. परदेशातून होणाऱ्या प्रत्यक्ष गुंतवणूकीमुळे (FDI) कोणते फायदे होतात ?

(a) आर्थिक वृद्धी

(b) गुंतवणूकीची पातळी वाढते

(c) तंत्रज्ञानात सुधारणा होते

(d) गुंतवणूकीचा ओघ परदेशाकडे वळतो

(e) मानवी आणि संस्थात्मक क्षमतांचा विकास होतो

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b), (c), (e) (2) (a), (b), (c), (d)

(3) (b), (c), (d), (e) (4) (a), (c), (d), (e)

Which of the following are the benefits of FDI ?

(a) Economic growth

(b) Raising level of investment

(c) Upgradation of technology

(d) Outflow of investment

(e) Develops human and institutional capabilities

**Answer options :**

(1) (a), (b), (c), (e) (2) (a), (b), (c), (d)

(3) (b), (c), (d), (e) (4) (a), (c), (d), (e)

---

30. जागतिकीकरणामुळे खालीलपैकी कोणते/ती घटक भारतीय उद्योगासाठी आव्हानात्मक ठरत आहे/आहेत ?

(a) उत्पादीत वस्तूंच्या बाजारपेठेत वाढती स्पर्धा.

(b) तंत्रज्ञानविषयक क्षमता सुधारण्यासाठी दबाव.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (b)

(3) दोन्ही (4) एकही नाही

Among the following which is/are the challenge/s for Indian industry created due to globalisation ?

(a) Greater competition in product market.

(b) Pressure for improving technological capacity.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b)

(3) Both (4) Neither

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

31. खालील व्याख्या कोणत्या मुद्रा अर्थशास्त्रज्ञाने केली आहे ते सांगा ?

"मुद्रेचे मूल्य म्हणजे वस्तू व सेवा खरेदी करण्याची मुद्रेची शक्ती असून ती सापेक्ष मूल्य स्तरावरून ओळखली जाऊ शकते".

(1) प्रा. क्राऊथर
(2) डी.एच. रॉबर्टसन
(3) प्रा. सेलिग्मन
(4) जे.एम. केन्स

Which monetary economist has given the following definition of money ?

"Value of money is its purchasing power over goods and services and can be known from relative price level".

(1) Prof. Crowther
(2) D.H. Robertson
(3) Prof. Seligman
(4) J.M. Keynse

---

32. **योग्य** पर्याय निवडा.

भारत सरकारच्या रोजगार हमी कायदा 2004 मधील तरतूदी.

(a) वर्षातून 100 दिवस रोजगाराची हमी.
(b) रोजगार निर्मितीसाठी सार्वजनिक कामे करणे.
(c) रोजगार करणाऱ्या व्यक्तीला किमान वेतनाची हमी.

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरील सर्व चूक
(2) वरील सर्व बरोबर
(3) (a) व (b) बरोबर
(4) केवळ (c) बरोबर

Choose **correct** option :

Provisions in Employment Guarantee Act - 2004 of Government of India.

(a) Employment guarantee for 100 days in a year.
(b) Public work for employment generation.
(c) Minimum wages to working person.

**Answer options :**

(1) All the above are incorrect
(2) All the above are correct
(3) (a) and (b) are correct
(4) Only (c) is correct

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

**33.** सामाजिक, आर्थिक व लिंग सबलीकरण ही स्त्रियांच्या सबलीकरणाची त्रिसूत्री योजना कोणत्या पंचवार्षिक योजनेत स्वीकारण्यात आली ?

(1) आठवी योजना (2) नववी योजना

(3) दहावी योजना (4) अकरावी योजना

In which five year plan, the trinity - Social, Economic and Gender empowerment - of women's empowerment was accepted ?

(1) Eighth Plan (2) Ninth Plan

(3) Tenth Plan (4) Eleventh Plan

---

**34.** पुढील विधानांचा विचार करा.

भारतातील संपत्तीच्या विषम वाटपासंदर्भात लोकांचे वैशिष्ट्य म्हणजे :

**विधान (I)** : ज्यांच्या उत्पन्नाचे मुख्य साधन नैसर्गिक उत्पादन साधन सामुग्री आहे.

**विधान (II)** : ज्यांच्या उत्पन्नाचे एकमेव व मुख्य साधन हे त्यांचे श्रम आहेत.

**आता सांगा :**

(1) दोन्ही विधाने चूक

(2) विधान (I) बरोबर, (II) चूक

(3) दोन्ही विधाने बरोबर

(4) विधान (II) बरोबर, (I) चूक

Consider the following statements :

In the context inequal distribution of wealth and income, the characteristics of Indian people are :

**Statement (I)** : Whose source of income is natural resources.

**Statement (II)** : Whose main and only source of income is his/her labour.

**State :**

(1) Both statements are incorrect

(2) Statement (I) is correct, (II) incorrect

(3) Both statements are correct

(4) Statement (II) is correct, (I) incorrect

---

35. खालीलपैकी कोणती भारताच्या निर्गुंतवणूक धोरणाची उद्दिष्ट्ये आहेत ?

(a) बिनमहत्त्वाच्या सार्वजनिक उद्योगात अडकलेला निधी मोकळा करणे.

(b) सार्वजनिक कर्जाचे प्रमाण कमी करणे.

(c) सार्वजनिक क्षेत्राची जोख़ीम खाजगी क्षेत्राकडे सोपवणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) (2) केवळ (c)

(3) (a) आणि (b) (4) वरील सर्व

Which of the following is/are the objectives of disinvestment policy in India ?

(a) Releasing public resources locked up in non-strategic PSEs.

(b) Reducing public debt.

(c) Transferring public sector risk to the private sector.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (c)

(3) (a) and (b) (4) All of the above

---

36. खालील विधाने विचारात घ्या.

(a) रोख राखीव गुणोत्तर हे पत नियंत्रणाचे प्रभावी साधन आहे.

(b) 9 फेब्रुवारी 2013 मध्ये रोख राखीव गुणोत्तर 4.0% पर्यंत कमी केले गेले.

(c) 11 ऑगस्ट 2012 मध्ये वैधानिक रोखता गुणोत्तर 1 ते 30% पर्यंत कमी केले गेले.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) (a) व (b) (2) (b) व (c) (3) (a) व (c) (4) फक्त (c)

Consider the following statements :

(a) The Cash Reserve Ratio (CRR) is an effective instrument of credit control.

(b) C.R.R. was reduced to 4.0% on Feb. 9, 2013.

(c) On Aug. 11, 2012 Statutory Liquidity Ratio was reduced up to 1 to 30%.

Which of the given above statement/s is/are **correct** ?

(1) (a) and (b) (2) (b) and (c) (3) (a) and (c) (4) Only (c)

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

**37.** फिशरच्या व्यवहार दृष्टीकोणानुसार पैशाची मागणी ही खालील घटकावर अवलंबून असते :

(a) व्यवहारांची संख्या

(b) व्यवहारांची सरासरी किंमत

(c) पैशाचा व्यवहारासाठीचा भ्रमणवेग

(d) रोखता पसंती

वरीलपैकी कोणता/ते पर्याय **चुकीचा/चे** आहे/त ?

(1) (a) व (b) (2) (c) व (d) (3) फक्त (d) (4) फक्त (a)

According to Fisher's transactions approach, a demand for money depend on the following factors :

(a) The number of transactions

(b) The average price of transactions

(c) The transaction velocity of circulation of money

(d) Liquidity preference

Which of the given above options is/are **incorrect** ?

(1) (a) and (b) (2) (c) and (d) (3) Only (d) (4) Only (a)

---

**38.** **योग्य** पर्याय निवडा.

प्रो. कॅल्डोर यांनी भारतात मालमत्ता कराऐवजी कोणता कर सुरू करण्याची शिफारस केली ?

(a) उत्पादन कर (b) संपत्ती कर (c) भांडवली लाभ कर

(d) देणगी कर (e) व्यय कर

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) (2) केवळ (d) (3) (c) व (e) (4) वरीलपैकी नाही

Choose **correct** option :

Which tax was recommended by Prof. Caldor to replace estate duty in India ?

(a) Excise Duty (b) Wealth tax (c) Capital gains tax

(d) Gift tax (e) Expenditure tax

**Answer options :**

(1) (a) and (b) (2) Only (d)

(3) (c) and (e) (4) None of the above

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

39. राज्यांचा एकत्रित निधी वाढवण्यासाठी खालीलपैकी कोणती उपाययोजना बाराव्या वित्त आयोगाने (2005-10) सुचविली आहे ?

(1) ग्रामपंचायत आणि नगरपालिकांच्या वित्तीय साधनांना पूरक निधी.

(2) विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेस प्रोत्साहन देणे.

(3) रस्ते आणि पूल बांधणे.

(4) आर्थिक विकासास चालना देणे.

Which of the following measures were recommended by Twelfth Finance Commission (2005-10) to augment the consolidated fund of states ?

(1) Supplement financial resources of Panchayats and Municipalities

(2) Provide an impetus to decentralisation process

(3) Construct roads and bridges

(4) Push economic growth further

---

40. भारतात 'महिला व बाल विकासा' साठी एक स्वतंत्र विभाग स्थापना करणारे पहिले राज्य कोणते ?

(1) केरळ (2) पंजाब

(3) दिल्ली (4) महाराष्ट्र

Which of the states in India was the first to establish a separate department for 'Women and Child Development' ?

(1) Kerala (2) Punjab

(3) Delhi (4) Maharashtra

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**41.** नॅशनल सॅम्पल सर्वे संस्थेकडून (NSSO) बेरोजगारीची संकल्पना विकसित करण्यात आली आहे. खालीलप्रमाणे :

(a) बेरोजगारीचा सामान्य स्थिती दर्जा

(b) बेरोजगारीचा चालू आठवड्याचा स्थिती दर्जा

(c) बेरोजगारीचा चालू दैनंदिन स्थिती दर्जा

(d) बेरोजगारीचा चालू वार्षिक स्थिती दर्जा

वरीलपैकी कोणता पर्याय **चुकीचा** आहे ?

(1) फक्त (a) (2) (a) व (c) (3) (b) व (d) (4) फक्त (d)

National Sample Survey Organisation developed the concept of unemployment is as follow :

(a) The usual status unemployment

(b) The current weekly status unemployment

(c) The current daily status unemployment

(d) The current yearly status unemployment

Which of the options given above is **incorrect** ?

(1) Only (a) (2) (a) and (c) (3) (b) and (d) (4) Only (d)

---

**42.** खालील विधाने विचारात घ्या.

(a) राष्ट्रीय पातळीवर दारिद्र्य गुणोत्तराचे मापन हे सुरेश तेंडुलकर समिती पद्धतीवर आधारित आहे.

(b) तेंडुलकर समिती पद्धतीचा आढावा घेण्यासाठी सरकारने 2013 मध्ये सी. रंगराजन समितीची नियुक्ती केली.

(c) नियोजन मंडळाच्या मते फक्त 15% भारतीय दारिद्र्यरेषेच्या खाली आहेत.

वरीलपैकी कोणते/ती विधाने **बरोबर** आहे/त ?

(1) (a) व (c) (2) फक्त (c)

(3) (a) व (b) (4) (b) व (c)

Consider the following statements :

(a) The national level poverty ratio is based on Suresh Tendulkar Committee methodology.

(b) The Government setup a committee under C. Rangarajan to review the Tendulkar methodology in 2013.

(c) According to the Planning Commission, only 15% Indians are below poverty level.

Which of the statement/s given above is/are **correct** ?

(1) (a) and (c) (2) Only (c)

(3) (a) and (b) (4) (b) and (c)

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

43. भारत सरकारला कोणत्या वस्तूंच्या गटाच्या उत्पादन आणि विक्रय उलाढालीपासून सर्वाधिक महसूल प्राप्त होतो ?

(a) अफू (b) दारू

(c) तंबाखू (d) सिगारेट

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) व (c) (2) (a), (b) व (d)

(3) (b), (c) व (d) (4) (a), (c) व (d)

From production and sale of which of the commodities, does Government of India get maximum revenue ?

(a) Opium (b) Liquor

(c) Tobacco (d) Cigarette

**Answer options :**

(1) (a), (b) and (c) (2) (a), (b) and (d)

(3) (b), (c) and (d) (4) (a), (c) and (d)

---

44. खालील विधाने विचारात घ्या.

(a) 2011-12 मध्ये सेवा करापासून मिळणाऱ्या महसुलात 37.4% वाढ झाली. याचा अर्थ असा की सेवा कर हा सार्वजनिक उत्पन्नाचा महत्त्वाचा स्त्रोत बनू लागला आहे.

(b) सात योजनांसाठी प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण योजना 1 जाने. 2013 ला संपूर्ण भारतात सुरू झाली.

वरील विधानांपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) व (b) दोन्ही (4) यापैकी नाही

Consider the following statements :

(a) In 2011-12, growth in service tax revenue was 37.4%, which indicated that service tax has been emerging as an important source of revenue.

(b) The Direct Benefit Transfer Plan was introduced on 1st Jan, 2013 with seven schemes in all over India.

Which of the statement/s given above is/are **correct** ?

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (a) and (b) (4) None of these

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

45. **योग्य** पर्याय निवडा.

मौद्रिक तूट म्हणजे :

(a) केंद्र सरकारने रिझर्व बँकेकडून केलेल्या उचल रकमेमध्ये झालेली निव्वळ वाढ.

(b) वित्तीय तूटीतून दिलेले व्याज वजा केल्यानंतर राहणारी शेष तूट होय.

(c) महसूली प्राप्ती, अनुदाने, कर्जेत्तर भांडवली प्राप्ती यांच्यापेक्षा सरकारच्या खर्चाचे अधिक्य.

(d) महसूली उत्पन्नापेक्षा महसूली खर्च अधिक्य.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) बरोबर (2) (b) बरोबर (3) (c) बरोबर (4) (d) बरोबर

Choose the **correct** option :

Monetised deficit means :

(a) Net hike in advances of Central Government from Reserve Bank.

(b) Balance after paying interest from fiscal deficit.

(c) Total expenditure of government higher than revenue collection, grants, non borrowing capital revenue.

(d) More revenue expenditure than revenue income.

**Answer options :**

(1) (a) is correct (2) (b) is correct (3) (c) is correct (4) (d) is correct

---

46. बी.आय.एफ.आर. कायद्याचे उद्दिष्ट _________ होते.

(1) आजारी उद्योगांना चालना देणे.

(2) सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण करणे.

(3) भारतीय उद्योगांमध्ये परकीय भांडवल वापरण्यास परवानगी देणे.

(4) मोठ्या खाजगी उद्योगांना पतपुरवठा करणे.

BIFR was supposed to deal with _________ .

(1) Revival of sick industries

(2) Privatization of public sector

(3) Approval to use of foreign capital in Indian industries

(4) Financing large scale private industries

---

47. कर महसूल, स्थूल उत्पन्नाच्या वाढीशी लवचिक करण्याच्या दृष्टीने, खालीलपैकी कोणता उपाय कर-सुधारणा समितीने सुचविला होता ?

(1) उच्च कर दर आणि संकुचित कर आधार

(2) उच्च कर दर आणि प्रशस्त कर आधार

(3) कमी कर दर आणि संकुचित कर आधार

(4) कमी कर दर आणि प्रशस्त कर आधार

To make tax-revenue more elastic to growth of GDP, which of the following measures were suggested by the tax - reform committee ?

(1) High tax rate and narrow tax base

(2) Higher tax rate and broad tax base

(3) Lower tax rate and narrow tax base

(4) Lower tax rate and broad tax base

---

48. MRTP क़ायदा मोडीत काढून 2009 साली त्याजागी अंमलात आणलेल्या कायद्याचे नाव __________ होते.

(1) फेमा (2) स्पर्धा कायदा

(3) अफ्स्पा कायदा (4) औद्योगिक धोरण उपाय (2009)

MRTP was replaced by __________ in 2009.

(1) FEMA (2) Competition Act

(3) AFSPA (4) Industrial Policy Resolution (2009)

---

49. खालील विधाने विचारात घ्या.

(a) 2006-07 मध्ये केंद्रीय करांचा राज्यांच्या कर उत्पन्नातील वाटा 31% होता.

(b) राज्यांच्या महसूलामध्ये कंपनी कराचे योगदान सर्वाधिक आहे.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) व (b) (4) यापैकी नाही

Consider the following statements :

(a) The share of central taxes in 2006-07 was 31% of the total tax revenue of states.

(b) The corporation tax is the largest contributor to the tax revenue of states.

Which of the statement/s given above is/are **correct** ?

(1) Only (a) (2) Only (b) (3) (a) and (b) (4) None of these

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

50. महाराष्ट्र राज्याचा दहाव्या पंचवार्षिक योजनेतील स्थूल उत्पादनातील सरासरी चक्रवाढ वृद्धी दर (ACGR) किती होता ?

(1) 8.3 टक्के (2) 8.6 टक्के (3) 8.7 टक्के (4) 8.2 टक्के

What was the Average Compound Growth Rate of gross production in Maharashtra during tenth five year plan ?

(1) 8.3 percent (2) 8.6 percent (3) 8.7 percent (4) 8.2 percent

---

51. व्यापारी बँकांना त्यांच्याजवळील नगद रोकडीचा काही भाग सरकारी रोखे खरेदी करण्यासाठी वापरावा लागतो या भागाला काय म्हणतात ?

(1) वैधानिक रोखता गुणोत्तर (2) रोख राखीव गुणोत्तर

(3) रेपोरेट (4) वरीलपैकी कोणतेही नाही

The commercial banks have to use some proportion of their cash to buy government securities. It is called as :

(1) Statutory Liquidity Ratio (2) Cash Reserve Ratio

(3) Reporate (4) None of the above

---

52. **योग्य** पर्याय निवडा.

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची ठळक वैशिष्ट्ये :

(a) भारताच्या एकूण लागवड क्षेत्रापैकी महाराष्ट्राचा हिस्सा 12.7% आहे.

(b) भारताच्या एकूण ओलिताखालील शेती क्षेत्रापैकी महाराष्ट्राचा केवळ 16.4% वाटा आहे.

(c) भारतीय वनक्षेत्रात महाराष्ट्राचे 61939 चौ. कि.मी. एवढे वनक्षेत्र आहे.

(d) 2001 च्या जनगणनेनुसार देशाच्या एकूण लोकसंख्येत महाराष्ट्राची 9.32% लोकसंख्या होती.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) (2) (b) व (c)

(3) (d) (4) वरील सर्व

Choose **correct** option :

Salient features of economy of Maharashtra :

(a) In total cultivated land of India, the share of Maharashtra is 12.7%.

(b) In total irrigated area of India, the share of Maharashtra is only 16.4%.

(c) In Indian forest, the share of Maharashtra is 61939 sq.k.m.

(d) As per census of 2001, in total population of India, Maharashtra's Population was 9.32%.

**Answer options :**

(1) (a) (2) (b) and (c)

(3) (d) (4) All the above

---

53. सुरेश तेंडुलकर (2009) समितीने अगोदरच्या दारिद्र्य अनुमान पद्धतीतील तीन त्रुटी दाखविल्या त्या म्हणजे __________.

(a) अन्नघटक कालबाह्य
(b) चलनवाढीचा सदोष निर्देशांक
(c) जन्म दर निर्देशांक
(d) शासनाद्वारे शिक्षण व आरोग्य सुविधांचा पुरवठा

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरील (a), (b), (c)    (2) वरील (a), (b), (d)
(3) वरील (a), (c), (d)    (4) वरील (b), (c), (d)

The Suresh Tendulkar Committee (2009) has pointed out the three deficiencies in earlier poverty estimation methods. They are :

(a) Outdated food articles
(b) Defective inflation index
(c) Birth rate index
(d) Facilities given by Government in education and health

**Answer options :**

(1) (a), (b), (c) of above    (2) (a), (b), (d) of above
(3) (a), (c), (d) of above    (4) (b), (c), (d) of above

---

54. पुढील विधानांचा विचार करा.

**विधान (I) :** सामान्यपणे ज्या पैश्यामध्ये पतपैसा निर्माण करण्याची शक्ती असते त्याला उच्च शक्ती पैसा असे म्हणतात.

**विधान (II) :** उच्च शक्ती पैश्याच्या संज्ञेत जनतेच्या हातातील चलन, बँकेकडील रोखता निधी व इतर ठेवीचा समावेश होतो.

**आता सांगा :**

(1) विधान (I) बरोबर, (II) चूक
(2) विधान (II) बरोबर, (I) चूक
(3) दोन्ही विधाने चूक
(4) दोन्ही विधाने बरोबर

Consider the following statements :

**Statement (I) :** Generally, the money that can create credit money is called high powered money.

**Statement (II) :** High powered money includes currency in the hand of people, liquidity of banks and other deposits

State :

(1) Statement (I) is correct, (II) incorrect
(2) Statement (II) is correct, (I) incorrect
(3) Both statements are incorrect
(4) Both statements are correct

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

55. खालील विधाने विचारात घ्या.

(a) 2014-15 मध्ये महाराष्ट्राच्या सेवा क्षेत्राचा विकास दर 10.8% होता.

(b) 2014-15 मध्ये महाराष्ट्र राज्यांतर्गत स्थूल उत्पादनात सेवा क्षेत्राचा वाटा 51% होता.

(c) 2012-13 मध्ये महाराष्ट्राच्या स्थूल राज्यांतर्गत उत्पादनात बांधकाम क्षेत्राचा वाटा 22% होता.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) (a) व (c) (2) (a) व (b)

(3) (b) व (c) (4) फक्त (c)

Consider the following statements :

(a) The growth rate of service sector in Maharashtra in 2014-15 was 10.8%.

(b) The share of services sectors in Maharashtra's Gross Domestic Production was 51% in 2014-15.

(c) The share of construction sector was 22% in the Maharashtra's State Gross Domestic Production in 2012-13.

Which of the given above statement/s is/are **correct** ?

(1) (a) and (c) (2) (a) and (b)

(3) (b) and (c) (4) Only (c)

---

56. भारत सरकारच्या खालीलपैकी दारिद्र्य-निवारणाच्या कोणत्या कार्यक्रमाअंतर्गत गरिबांना कमी दरात धान्य दिले गेले ?

(1) एन.आर.इ.पी. (2) आय.आर.डी.पी. (3) एस.जे.जी.वाय. (4) पी.डी.एस.

Which of the following anti-poverty programmes of the Government of India provided subsidised food to the poor people ?

(1) NREP (2) IRDP (3) SJGY (4) PDS

---

57. भारतात 14 व्या वित्त आयोगाचे सचिव म्हणून कोणाची नियुक्ती करण्यात आली ?

(1) विजय केळकर (2) डॉ. वाय.व्ही. रेड्डी

(3) सुमित बोस (4) अबू सालेह शरीफ

Who was appointed as the Secretary of $14^{th}$ Finance Commission of India ?

(1) Vijay Kelkar (2) Dr. Y.V. Reddy

(3) Sumit Bose (4) Abu Saleh Sharif

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

58. पुढील विधानांचा विचार करा.

महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राच्या विकासाबाबत :

**विधान (I) :** महाराष्ट्र राज्यातील एकुण रोजगारात सहकारी क्षेत्राचा वाटा 12.5% आहे.

**विधान (II) :** महाराष्ट्रात 229 सहकारी शेती संस्था असून त्याने 11000 हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आणले आहे.

**आता सांगा :**

(1) विधान **(I)** बरोबर, **(II)** चूक

(2) विधान **(II)** बरोबर, **(I)** चूक

(3) दोन्ही विधाने बरोबर

(4) दोन्ही विधाने चूक

Consider the following statements :

In the context of development of cooperative sector in Maharashtra :

**Statement (I) :** In total employment sector of Maharashtra, the share of cooperative sector is 12.5%.

**Statement (II) :** There are 229 cooperative agriculture institutions in Maharashtra, that has brought 11000 hectre area under cultivation.

**State :**

(1) Statement **(I)** is correct, **(II)** incorrect

(2) Statement **(II)** is correct, **(I)** incorrect

(3) Both statements are correct

(4) Both statements are incorrect

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

59. **योग्य** पर्याय निवडा.

भारतात गांधी जयंती (2 ऑक्टोबर 1980) रोजी कोणता दारिद्र्य निर्मूलन व रोजगार निर्मिती कार्यक्रम सुरू करण्यात आला ?

(a) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम

(b) ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम

(c) आश्वासित रोजगार कार्यक्रम

(d) पंतप्रधान रोजगार योजना

(e) ट्रायसेम

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (c) व (d)
(2) (b) व (d)
(3) केवळ (e)
(4) (b) व (e)

Choose **correct** option :

Which of the following poverty eradication and employment generation programme was incepted in India on Gandhi Jayanti ($2^{nd}$ October 1980) ?

(a) National Rural Employment Scheme

(b) Rural Landless Employment Guarantee Programme

(c) Employment Assurance Scheme

(d) Prime Minister Rozgar Yojana

(e) TRYSEM

**Answer options :**

(1) (a), (c) and (d)
(2) (b) and (d)
(3) Only (e)
(4) (b) and (e)

---

60. खालीलपैकी कोणते मागणीजन्य चलन फुगवट्याचे कारण **नाही** ?

(1) अर्थव्यवस्थेतील पैशाच्या पुरवठ्यात वृद्धी

(2) लोकांच्या बचतीमधे घट

(3) निर्यातीत वाढ

(4) मजूरीदरात वाढ

Which of the following is **not** a cause of demand pull inflation ?

(1) Increase in money supply in the economy

(2) Reduction in savings of people

(3) Rise in exports

(4) Increase in wage rate

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

61. जोड्या जुळवून **योग्य** पर्याय निवडा.

| | सिंचन अभ्यास गट | | स्थापना वर्ष |
|---|---|---|---|
| (a) | अवर्षण प्रवण क्षेत्राची सत्यशोधन समिती | (i) | 1984 |
| (b) | आठमाही पाणी वापर समिती | (ii) | 1981 |
| (c) | कोकण बृहद् आराखडा समिती | (iii) | 1995 |
| (d) | प्रादेशिक अनुशेष विषयक समिती | (iv) | 1979 |
| (e) | मुंबई पाणी पुरवठा समिती | (v) | 2000 |
| (f) | मुंबई महानगर पाणी पुरवठा समिती | (vi) | 1973 |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) | (e) | (f) |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) | (v) | (vi) |
| (2) | (vi) | (iv) | (ii) | (i) | (iii) | (v) |
| (3) | (iv) | (i) | (iii) | (ii) | (v) | (vi) |
| (4) | (vi) | (v) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

Match the following and choose **correct** code.

| | Irrigation Task Force | | Year of Establishment |
|---|---|---|---|
| (a) | Fact finding committee of drought area | (i) | 1984 |
| (b) | Eight month Water Distribution Committee | (ii) | 1981 |
| (c) | Konkan Master Plan Committee | (iii) | 1995 |
| (d) | Regional Backlog Committee | (iv) | 1979 |
| (e) | Mumbai Water Supply Committee | (v) | 2000 |
| (f) | Mumbai Metro Water Supply Committee | (vi) | 1973 |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) | (e) | (f) |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) | (v) | (vi) |
| (2) | (vi) | (iv) | (ii) | (i) | (iii) | (v) |
| (3) | (iv) | (i) | (iii) | (ii) | (v) | (vi) |
| (4) | (vi) | (v) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

62. भारतातील पायाभूत सुविधा विकासाचे वैशिष्ट्य म्हणजे _________ .

(a) पायाभूत सुविधांचा प्रामुख्याने शहरी भागांना पुरवठा

(b) ग्रामीण पायाभूत सुविधांचा अपुरा विकास

(c) श्रीमंत आणि सधन वर्गाला झुकते माप

गाळलेली जागा भरा.

(1) केवळ (a) (2) केवळ (b)

(3) केवळ (c) (4) वरील सर्व

Expansion of infrastructural facilities in India is characterised by _________ .

(a) Provision of infrastructural facilities mainly for the urban areas

(b) Inadequate development in rural infrastructure facilities

(c) Bias in favour of rich and more affluent

Fill in the blank.

(1) Only (a) (2) Only (b)

(3) Only (c) (4) All of the above

---

63. NSSO ने दिलेल्या बेरोजगारीच्या व्याख्येनुसार दीर्घकालीन बेरोजगारी म्हणजे बेरोजगारीची _________.

(1) नित्य प्रमुख अवस्था

(2) साप्ताहिक अवस्था

(3) दैनिक अवस्था

(4) अर्ध रोजगारी

As per the definition of unemployment given by NSSO, chronic unemployment means _________ .

(1) Usual Principal Status Unemployment

(2) Weekly Status Unemployment

(3) Daily Status Unemployment

(4) Underemployment

---

64. खालीलपैकी कोणता भारताच्या केंद्रशासनाच्या भांडवली खर्चाचा भाग **नाही** ?

(1) संरक्षणावरील खर्च

(2) सामाजिक आणि सामुहिक विकासावरील खर्च

(3) व्याजाचा भरणा

(4) सर्वसाधारण सुविधांवरील खर्च

Which of the following is **not** a part of capital expenditure of Central Government of India ?

(1) Expenditure on defence

(2) Expenditure on Social and Community Development

(3) Interest payments

(4) Expenditure on general services

---

65. महाराष्ट्रातील वीजनिर्मितीमध्ये 2015-16 मध्ये नवीकरणीय ऊर्जेचा वाटा ________ तर टाटा पॉवरचा वाटा ________ होता.

(1) 7.8% व 7.5% (2) 7.4% व 7.5%

(3) 15.9% व 7.4% (4) 7.8% व 7.4%

The share of renewable energy in electricity generation in Maharashtra has been ________ in 2015-16; while that of Tata Power has been ________ .

(1) 7.8% and 7.5% (2) 7.4% and 7.5%

(3) 15.9% and 7.4% (4) 7.8% and 7.4%

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

66. खालील विधाने विचारात घ्या.

(a) 1985 मध्ये भारत सरकारने सर्वसमावेशक पीक विमा योजना सुरु केली.

(b) 1999 मध्ये खरीप पिकांसाठी राष्ट्रीय कृषी पीक विमा योजना सुरु केली.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **योग्य** आहे/त ?

(1) फक्त (b) (2) (a) व (b) (3) फक्त (a) (4) यापैकी नाही

Consider the following statements.

(a) The Government of India launched a comprehensive scheme of crop insurance in 1985.

(b) National Agricultural Insurance Scheme introduced for Kharif crop in 1999.

Which statement/s is/are **correct** from above ?

(1) Only (b) (2) (a) and (b) (3) Only (a) (4) None of these

---

67. खालील विधाने विचारात घ्या.

(a) प्रधानमंत्री ग्राम-सडक योजना डिसेंबर, 2000 मध्ये सुरु केली.

(b) या योजनासाठी राज्य सरकारकडून संपूर्ण निधी दिला जातो.

(c) 500 लोकवस्ती असलेल्या परंतु रस्ते सुविधा नसलेल्या गावांना जोडणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

वरीलपैकी कोणती/ते विधाने/न **बरोबर** आहेत/आहे ?

(1) फक्त (a) (2) (b) व (c) (3) (a) व (c) (4) (a) व (b)

Consider the following statements.

(a) The Pradhan Mantri Gram Sadak Yojana was launched in December, 2000.

(b) It is fully funded by state government.

(c) The objective of providing connectivity to the eligible unconnected habitations in the core network with a population of 500 persons.

Which statement/s is/are **correct** from above ?

(1) Only (a) (2) (b) and (c) (3) (a) and (c) (4) (a) and (b)

---

68. जोड्या जुळवून **योग्य** पर्याय निवडा.

नवीन कृषी धोरणाची इंद्रधनुषी क्रांती.

| | **क्रांती** | | **संदर्भ** |
|---|---|---|---|
| (a) | चंदेरी क्रांती | (i) | तेल बियाण्याबाबत |
| (b) | गुलाबी क्रांती | (ii) | फळे (अननसाबाबत) |
| (c) | बदली क्रांती | (iii) | खतांबाबत |
| (d) | करडी क्रांती | (iv) | मसाल्याबाबत |
| (e) | सोनेरी क्रांती | (v) | शिंपल्याबाबत |
| (f) | पिवळी क्रांती | (vi) | अंड्याबाबत |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** | **(e)** | **(f)** |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iii) | (v) | (iv) | (ii) | (vi) |
| (2) | (vi) | (v) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (i) | (ii) | (iii) | (iv) | (v) | (vi) |
| (4) | (vi) | (iv) | (ii) | (i) | (iii) | (v) |

Match the following and choose **correct** code.

Rainbow Revolution of New Agricultural Policy.

| | **Revolution** | | **Context** |
|---|---|---|---|
| (a) | Silver Revolution | (i) | Oil Seeds |
| (b) | Pink Revolution | (ii) | Fruit (Pineapple) |
| (c) | Transition Revolution | (iii) | Fertilizers |
| (d) | Gray Revolution | (iv) | Spices/Condiments |
| (e) | Golden Revolution | (v) | Shrimp |
| (f) | Yellow Revolution | (vi) | Eggs |

**Answer options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** | **(e)** | **(f)** |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iii) | (v) | (iv) | (ii) | (vi) |
| (2) | (vi) | (v) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (i) | (ii) | (iii) | (iv) | (v) | (vi) |
| (4) | (vi) | (iv) | (ii) | (i) | (iii) | (v) |

69. भारतातील बहुराष्ट्रीय कंपन्यांचे कार्य नियंत्रित करण्यासाठी 1973 मध्ये कोणता कायदा जाहीर करण्यात आला आणि 1 जानेवारी 1974 पासून तो खऱ्या अर्थाने कार्यान्वीत झाला ?

(1) विदेश विनिमय व्यवस्थापन कायदा (FEMA)

(2) वित्तीय जबाबदारी आणि अंदाजपत्रकीय व्यवस्थापन कायदा (FRBMA)

(3) उद्योगांसाठीचा (विकास आणि नियमन) कायदा

(4) विदेश विनिमय नियमन कायदा

To control the operations of MNCs in India, which Act was promulgated in 1973 and it came into force on January 1, 1974 ?

(1) FEMA (Foreign Exchange Management Act)

(2) FRBMA (Fiscal Responsibility and Budget Management Act)

(3) Industries (Development and Regulation) Act

(4) FERA (Foreign Exchange Regulation Act)

---

70. राष्ट्रीय विकास मंडळाने भारत सरकारने धान्य व्यापारात पदार्पण करावे अशी शिफारस कधी केली ?

(1) 1951 (2) 1958 (3) 1977 (4) 1985

When did National Development Council recommend the entry of Govt. of India into food trade ?

(1) 1951 (2) 1958 (3) 1977 (4) 1985

---

71. पुढील विधानांचा विचार करा.

भारतातील भूसुधारणा कार्यक्रम संदर्भात :

**विधान (I) :** सन 1947 - 48 मध्ये एकूण शेतीच्या 57% भाग जमिनदारी व मालगुजारी पद्धतीच्या अंतर्गत येत होता.

**विधान (II) :** जमिनदारी पद्धत ही कास्तकारांच्या शोषणावर आधारित होती.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान **(I)** बरोबर, **(II)** चूक

(2) विधान **(II)** बरोबर, **(I)** चूक

(3) दोन्ही विधाने चूक

(4) दोन्ही विधाने बरोबर

Consider the following Statements.

About land reforms in India :

**Statement (I) :** In 1947 - 48, 57% of total farm land was under Zamindari and Malguzari system.

**Statement (II) :** Zamindari system depended on the exploitation of farm labourers.

**Answer options :**

(1) Statements **(I)** is correct, **(II)** incorrect

(2) Statement **(II)** is correct, **(I)** incorrect

(3) Both Statements are incorrect

(4) Both Statements are correct

---

72. केंद्रशासन पुरस्कृत 'गुणवत्ताधारक व शुद्ध दूध उत्पादनासाठी सशक्त पायाभूत सुविधा योजना' (CMP) ऑक्टोबर, 2003 मध्ये कार्यान्वीत झाली. या योजनेचा मुख्य उद्देश काय आहे /आहेत ?

(a) देशातील जिल्हा पातळीवरील आजारी दुग्ध सहकारी संघांचे पुनरुज्जीवन करणे.

(b) देशातील ग्रामपातळीवरील कच्च्या दुग्ध उत्पादनाच्या गुणवत्तेत सुधारणा घडवून आणणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) (2) केवळ (b) (3) दोन्ही (4) एकही नाही

Which one of the following is/are main objective/s of a Centrally Sponsored Scheme 'Strengthening Infrastructure for Quality and Clean Milk Production' (CMP) launched in October, 2003 ?

(a) Revitalizing the Sick Dairy Cooperative Unions at the District level in the country.

(b) Improving the quality of raw milk produced at the village level in the country.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

73. **योग्य** पर्याय निवडा.

भारतातील पीक पद्धतीवर परिणाम करणारे घटक :

(a) पिकांची फेररचना (b) किंमती व उत्पन्न महत्तम करणे

(c) शेतीचा आकार (d) जोखीम स्वीकारणारा विमा

(e) आदानाची उपलब्धता (f) भूधारणा पद्धती

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) व (c) (2) (d) व (e)

(3) वरील सर्व चूक (4) वरील सर्व बरोबर

Choose **correct** option.

Factors affecting Indian Crop Pattern :

(a) Crop rotation (b) Maximization of Price and Income.

(c) Size of farm (d) Risk coverage insurance

(e) Availability of Input (f) Land holding system

**Answer options :**

(1) (a), (b) and (c) (2) (d) and (e)

(3) All the above are incorrect (4) All the above are correct

---

74. खालील विधाने विचारात घ्या.

(a) राष्ट्रीय कृषी विकास योजना सन 2007-08 मध्ये सुरु करण्यात आली.

(b) किसान क्रेडीट कार्ड योजनेची अंमलबजावणी ऑगस्ट, 1998 पासून करण्यात येत आहे.

(c) राष्ट्रीय कृषी विमा योजना भारतातील 16 राज्यात अंमलात आणली.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) फक्त (a) (2) फक्त (c) (3) (a) व (b) (4) सर्व बरोबर

Consider the following statements.

(a) Rashtriya Krishi Vikas Yojana was launched in 2007-08.

(b) Kisan Credit Card Scheme was introduced in August, 1998.

(c) National Agricultural Insurance scheme is implemented in 16 states of India.

Which statement/s is/are **correct** from above ?

(1) Only (a) (2) Only (c) (3) (a) and (b) (4) all above

---

75. **योग्य** पर्याय निवडा :

मानवी दारिद्र्य निर्देशांक मापनाच्या संदर्भात :

(a) दीर्घ व निरोगी आयुष्य

(b) ज्ञान आणि माहिती

(c) योग्य राहणीमान

(d) सामाजिक विशेष

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) योग्य

(2) (a) व (b) अयोग्य

(3) (a), (b) आणि (c) योग्य

(4) केवळ (c) आणि (d) बरोबर

Choose **correct** option :

In the context of Human Poverty Index :

(a) Long and Healthy Life Expectancy

(b) Knowledge and Information

(c) Standard of Living

(d) Social Standards

**Answer options :**

(1) (a) and (b) are correct

(2) (a) and (b) are incorrect

(3) (a), (b) and (c) are correct

(4) Only (c) and (d) are correct

76. खालील जोड्या जुळवा.

| 'अ' ( कायदे ) | | 'ब' ( तरतूदी ) | |
|---|---|---|---|
| (a) | महाराष्ट्र (मुंबई) नगरपालिका कायदा | (i) | कारखान्यातील प्रदूषण आणि अपघात नियंत्रण |
| (b) | महाराष्ट्र जमीन सुधारणा कायदा | (ii) | वाहन प्रदूषणाचे नियंत्रण |
| (c) | महाराष्ट्र मोटार वाहन कायदा | (iii) | सार्वजनिक स्वच्छतागृहाची दुरुस्ती |
| (d) | कारखाना कायदा | (iv) | शेतजमिनीच्या इतर वापरासाठीच्या हस्तांतरणासाठी प्रतिबंध |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (3) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (4) | (iv) | (ii) | (i) | (iii) |

Match the following pairs :

| 'A' (Law) | | 'B' (Provisions) | |
|---|---|---|---|
| (a) | Maharashtra (Mumbai) Municipal Act | (i) | Control of accidents and pollution in Factories |
| (b) | Maharashtra Land Reforms Act | (ii) | Control of Vehicle pollution |
| (c) | Maharashtra Motor Vehicle Act | (iii) | Maintenance of general sanitation |
| (d) | Factory Act | (iv) | Restriction of conversion of agricultural land for other purposes. |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (3) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (4) | (iv) | (ii) | (i) | (iii) |

77. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या सुचनेनुसार दुसऱ्या हरित क्रांतीत खालील बाबींचा समावेश नाही :

(a) शेती व्यापाराच्या जागतिकरणात भारतीय शेतकऱ्याच्या सहभागास मदत करणे.

(b) पीक हंगामातील नुकसान कमी करणे.

(c) अन्नसाठ्यात सुधारणा करणे.

(d) शेतीमधील परकीय गुंतवणूकीस प्रोत्साहन देणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) (2) (c) व (d) (3) फक्त (a) (4) फक्त (d)

The Second Green Revolution proposed by Prime Minister Dr. Manmohan Singh, does not include :

(a) Helping Indian farmers participate in global agricultural trade.

(b) Minimize loss of crops.

(c) Improve storage of crops.

(d) Encourage foreign direct investment in agriculture.

**Answer options :**

(1) (a) and (b) (2) (c) and (d) (3) Only (a) (4) Only (d)

---

78. चुकीचा गट ओळखा.

भारतीय वनखात्याने नॅशनल वेस्टलँड समितीच्या साह्याने पडीक जमिनींच्या विकासासाठी सन 1985 मध्ये काही जिल्ह्यांची निवड केली :

(a) अलमोरा (उत्तर प्रदेश) (b) पुरुलिया (पश्चिम बंगाल)

(c) लातूर (महाराष्ट्र) (d) बेल्लारी (कर्नाटक)

(e) बस्तर (छत्तीसगड) (f) दुर्गापूर (राजस्थान)

(g) संगरगड (ओरिसा)

**पर्यायी उत्तरे :**

(1) (c) व (e) (2) (a) व (b) (3) (d) व (f) (4) फक्त (g)

Choose mismatching group.

Indian Forest Department in association with National Waste Land Committee selected certain districts for development and reclaimation of waste land in India in 1985 :

(a) Almora (UP) (b) Puruliya (West Bengal)

(c) Latur (Maharashtra) (d) Bellary (Karnataka)

(e) Bastar (Chhattisgarh) (f) Durgapur (Rajasthan)

(g) Sangargadh (Orissa)

**Answer options :**

(1) (c) and (e) (2) (a) and (b) (3) (d) and (f) (4) Only (g)

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

79. सार्क अधिमान्य व्यापार क्षेत्र करार सार्क देशाकडून खालीलपैकी कोणत्या वर्षी करण्यात आला ?

(1) एप्रिल, 1983 (2) जानेवारी, 1974 (3) एप्रिल, 1993 (4) मार्च, 2003

Which year SAARC Preferential Trade Area (SAPTA) agreement was signed by SAARC country ?

(1) April, 1983 (2) January, 1974 (3) April, 1993 (4) March, 2003

---

80. मानवी विकास, 2014 च्या अहवालात मानवी विकास निर्देशांक मूल्यानुसार नार्वे प्रथम क्रमांकावर आहे. या अहवालानुसार संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम संकल्पनेप्रमाणे मानवी विकास निर्देशांक, 2013 नुसार भारत 187 राष्ट्रांपैकी 135 व्या क्रमांकावर आहे. मानवी विकास निर्देशांकाचे महत्तम मूल्य काय आहे, जे कोणत्याही राष्ट्राला गाठता आलेले नाही ?

(1) 1 (2) 100 (3) 500 (4) 1000

In the Human Development Report, 2014 Norway ranks first with HDI Value. According to this report, India ranks 135 out of 187 countries in terms of UNDP's (United Nations Development Programme) Human Development Index for 2013. What is the maximum value of HDI, which no country has succeeded in achieving it ?

(1) 1 (2) 100 (3) 500 (4) 1000

---

81. भारताने बाली येथील मंत्री परिषदेत डिसेंबर, 2013 मध्ये व्यापारविषयक सुविधा आणि विकासाशी संबंधित मुद्दांव्यतिरिक्त शेतीशी संबंधित मुद्दे अधिक गांभीर्याने घेण्याविषयी मागणी केली. त्यातील खालीलपैकी कोणता एक महत्त्वाचा मुद्दा आहे ?

(a) कृषिविषयक अनुदानांमध्ये वाढ घडवून आणणे.

(b) अन्नधान्य सुरक्षेवरील खर्च हा शेतीविषयक अनुदानाचा भाग म्हणून मोजण्यात येवू नये.

(c) शेतीविषयक वस्तूंची निर्यात कमी करणे.

(d) वरीलपैकी नाही

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) (2) केवळ (b) (3) (a), (b) (4) केवळ (d)

The Bali Ministerial Conference, December, 2013 taken agricultural issues more seriously alongwith trade - facilitation and development issues. India has demanded in Bali Conference, which one of the following important issue ?

(a) To increase agricultural subsidies

(b) Not to count food security expenses as part of agricultural subsidies

(c) To reduce export of agricultural goods

(d) Neither

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) (a), (b) (4) Only (d)

---

82. पुढील विधानांचा विचार करा.

**विधान (I)** : 1951 च्या तुलनेत आज पोलाद उत्पादनात 10 पट वाढ झाली.

**विधान (II)** : भारताला पोलाद निर्मितीसाठी आवश्यक विदेशी मदत प. जर्मनी, रशिया, इंग्लंड, फ्रान्स इ. देशांकडून मिळाली.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान **(II)** बरोबर, **(I)** चूक

(2) विधान **(I)** बरोबर, **(II)** चूक

(3) दोन्ही विधाने चूक

(4) दोन्ही विधाने बरोबर

Consider the following statements.

**Statement (I)** : In comparison with 1951, presently steel production has increased by 10 times.

**Statement (II)** : India receives essential help in steel production from West Germany, Russia, England and France.

**Answer options :**

(1) Statement **(II)** is correct, **(I)** incorrect

(2) Statement **(I)** is correct, **(II)** incorrect

(3) Both statements are incorrect

(4) Both statements are correct

---

83. **योग्य** पर्याय निवडा.

बहुराष्ट्रीय निगम या संकल्पनेत पुढील कोणत्या घटकांचा समावेश होतो ?

(a) संक्रमण मंडळ (b) आंतरराष्ट्रीय निगम

(c) वैश्विक निगम (d) बहुविध मंडळ

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) व (c) (2) केवळ (d)

(3) केवळ (a) (4) वरीलपैकी कोणतेही नाही

Choose **correct** option.

Which of the following factors does multinational corporation include ?

(a) Transitional Corporation (b) International Corporation

(c) Global Corporation (d) Multiple Corporation

**Answer options :**

(1) (a), (b) and (c) (2) Only (d)

(3) Only (a) (4) None of the above

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

84. व्यापार आणि जकातीचा सर्वसाधारण करार या बाबतीत :

(a) 1947 मध्ये 23 देशांनी GATT करारावर सह्या केल्या.

(b) भारताला 1994 मध्ये GATT सभासदत्व मिळालेले होते.

(c) 1994 मध्ये 118 देश GATT चे सभासद होते.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) (a) व (b) (2) (a) व (c) (3) (b) व (c) (4) फक्त (b)

Consider the following statements about General Agreement of Trade and Tariffs (GATT) :

(a) GATT was signed by 23 countries in 1947

(b) India got the membership of GATT in 1994

(c) In 1994, 118 countries are members of GATT

Which statement/s is/are **correct** from above ?

(1) (a) and (b) (2) (a) and (c) (3) (b) and (c) (4) Only (b)

---

85. राष्ट्रीय लोकसंख्या धोरण, 2000 ने सुचविल्यानुसार खालील राष्ट्रीय सामाजिक-लोकसंख्याशास्त्रीय ध्येय 2010 पर्यंत साध्य करण्याचे ठरले.

(a) 14 वर्षापर्यंतच्या मुलांना शालेय शिक्षण मोफत आणि सक्तीचे करणे.

(b) जन्म, मृत्यू, विवाह आणि गरोदर-स्त्रिया यांची 80% नोंदणी साध्य करणे.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **योग्य** आहे/त ?

(1) फक्त (a) (2) (a) व (b) (3) फक्त (b) (4) यापैकी नाही

The National Population Policy, 2000 has suggested following national socio - demographic goals to be achieved by 2010.

(a) Make school education upto the age of 14, free and compulsory.

(b) Achieve 80% registration of Birth, death, Marriage and Pregnancy.

Which of the statement/s given above is/are **correct** ?

(1) Only (a) (2) (a) and (b) (3) Only (b) (4) None of these

---

86. खालीलपैकी कोणता देश 'आशियान संघटनेशी' संबंधित **नाही** ?

(1) इंडोनेशिया (2) सिंगापुर (3) थायलंड (4) चीन

Which of the following country does **not** belong to ASEAN ?

(1) Indonesia (2) Singapore (3) Thailand (4) China

---

87. योग्य पर्याय निवडा.

भारतातील पाणलोट व्यवस्थापनाची उद्दिष्ट्ये :

(a) जंगल लागवड व वृक्षारोपण

(b) पाऊसाच्या पाण्याचे संवर्धन

(c) जमिनीचे पाणी वाढविण्याची क्षमता वाढविणे

(d) खड्डे खोदून त्यात पाणी जिरविणे

(e) कृषी उद्योग वाढीस लावणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (e) (2) (b), (c) व (d)

(3) वरील सर्व बरोबर (4) वरील सर्व चूक

Choose **correct** option.

Objectives of water shed management in India :

(a) Forestation and Tree Plantation

(b) Rain water harvesting

(c) Increasing capacity of ground water level

(d) Digging trenches and water feeding

(e) To Promote agrobase industries.

**Answer options :**

(1) (a) and (e) (2) (b), (c) and (d)

(3) All the above are correct (4) All the above are incorrect

88. आधुनिक काळात प्रमंडळ शेती पद्धती कोणत्या देशात दिसून येते ?

(1) रशिया (2) चीन (3) अमेरिका (4) इस्रायल

Which of the following country has corporate farming system in modern times ?

(1) Russia (2) China (3) America (4) Israel

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

89. पंचवार्षिक नियोजनात ग्रामीण विकासावर विशेष भर देण्यात आला. एका पंचवार्षिक योजनेत एकूण गुंतवणूकीपैकी 43 टक्के गुंतवणूक एकात्मिक ग्रामीण विकासाकरिता उपलब्ध करून देण्यात आली. कोणत्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत ग्रामीण विकासावर विशेष भर देण्यात आला ?

(1) दुसरी पंचवार्षिक योजना (2) पाचवी पंचवार्षिक योजना

(3) सहावी पंचवार्षिक योजना (4) अकरावी पंचवार्षिक योजना

In the Five Year Plans had laid special emphasis on rural development. In one of the five year plan 43 percent of total investment is made available for Integrated Rural Development. In which five year plan had laid special emphasis on rural development ?

(1) Second Five Year Plan (2) Fifth Five Year Plan

(3) Sixth Five Year Plan (4) Eleventh Five Year plan

---

90. भारत सरकारने स्वीकारलेल्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेची मुख्य वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :

(a) बाल विकास (b) दुहेरी किंमत

(c) केंद्र – राज्य नियंत्रण (d) परकीय व्यापार

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **अयोग्य** आहे/त ?

(1) (a) व (b) (2) (a) व (c) (3) (b) व (c) (4) (a) व (d)

The public distribution system has adopted by the government of India. The features of PDS are as follows :

(a) Child development (b) Dual prices

(c) Centre - state control (d) Foreign Trade

Which is/are **incorrect** from the above ?

(1) (a) and (b) (2) (a) and (c) (3) (b) and (c) (4) (a) and (d)

---

91. शाश्वत विकासाची पुढील व्याख्या कोणी केली ?

"शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो मानवी गरजांचे समाधान चिरकाल टिकविणे व मांनवी जीवनाचा दर्जा सुधारणे हे साध्य करणे होय".

(1) ब्रुडलँड अहवाल (2) रेमॉन्ड

(3) के. पारिख (4) रॉबर्ट ॲलन

Who has defined sustainable development thus ?

"Sustainable development is that development that is likely to achieve lasting satisfaction of human needs and improvement of quality of human life".

(1) Broodland Report (2) Raymond

(3) K. Parikh (4) Robert Allen

---

92. भारतीय शेती संशोधन मंडळ खालील विषयांसाठी उपक्रम आयोजित करते :

(a) फलोत्पादन (b) शेती वित्त

(c) शेती बाजारपेठा (d) पशु विज्ञान

वरीलपैकी कोणता/कोणते पर्याय **योग्य** आहे/त ?

(1) (a) व (b) (2) (b) व (c) (3) (c) व (d) (4) (a) व (d)

The Indian Council of Agricultural Research organise activities on the following subjects :

(a) Horticulture (b) Agricultural Credit

(c) Agricultural Marketing (d) Animal Science

Which above option/s is/are **correct** ?

(1) (a) and (b) (2) (b) and (c) (3) (c) and (d) (4) (a) and (d)

---

93. भारतीय परकीय व्यापार संस्था खालील उपक्रमामध्ये कार्यरत आहे :

(a) आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या आधुनिक तंत्रज्ञानाचे कार्यरत व्यक्तींना प्रशिक्षण देणे.

(b) बाजारपेठांचे संशोधन करणे.

(c) शेतीमाल आयातीस प्रोत्साहन देणे.

(d) परकीय व्यापारासंबंधित वस्तु सर्वेक्षण करणे.

वरीलपैकी कोणते/ती पर्याय **अयोग्य** आहे/त ?

(1) (a) व (b) (2) (c) व (d) (3) फक्त (b) (4) फक्त (c)

Indian Institute of Foreign Trade is engaged in following activities :

(a) Training of personnel in Modern Techniques of International Trade.

(b) Conducting market research.

(c) Promoting the agricultural import.

(d) Commodity surveys related to Foreign Trade.

Which option/s is/are **incorrect** from above ?

(1) (a) and (b) (2) (c) and (d) (3) Only (b) (4) Only (c)

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

94. 2005-09 या कालावधीत सुरु केलेल्या भारत निर्माण कार्यक्रमात ग्रामीण विकासाच्या घटकांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले. ते घटक याप्रमाणे :

(a) पिण्याचे पाणी व स्वच्छता (b) ग्रामीण गृहनिर्माण

(c) महामार्ग बांधणी (d) ग्रामीण विद्युतीकरण

वरीलपैकी कोणता/ते पर्याय **अयोग्य** आहे/त ?

(1) (a) व (b) (2) (c) व (d) (3) फक्त (b) (4) फक्त (c)

Bharat Nirman Programme launched in 2005-09 which focus on following components for development :

(a) Drinking water and sanitation (b) Rural housing

(c) Built-up highway (d) Rural electrification

Which is/are **incorrect** option/s from the above ?

(1) (a) and (b) (2) (c) and (d) (3) Only (b) (4) Only (c)

---

95. **योग्य** पर्याय निवडा.

राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत फलोत्पादन विकासासंबंधी बाबी :

(a) उत्तम बाजारपेठेची स्थापना

(b) उच्च मूल्यांकित पिकांची लागवड

(c) उच्च तंत्रज्ञानाचा अवलंब

(d) कंत्राटी शेती पद्धतीचा अवलंब

(e) संशोधन व शास्त्रीय प्रक्रिया

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) व (c) (2) (d) व (e)

(3) वरील सर्व योग्य आहेत (4) वरील सर्व अयोग्य आहेत

Choose **correct** Option.

About horticulture development under National Horticulture Mission :

(a) Healthy market

(b) High profit crop cultivation

(c) Use of high technology

(d) Development of contract farming system

(e) Research and Scientific Process

**Answer options :**

(1) (a), (b) and (c) (2) (d) and (e)

(3) All the above are correct (4) All the above are incorrect

---

96. भरपुर कृषि उत्पादन झालेल्या काळात जर किमतीत जास्त घसरण झाली तर उत्पादक शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी केंद्र सरकार __________ किंमत निश्चित करते.

(1) किमान आधारभूत किंमत (2) वैधानिक किमान किंमत
(3) शासकीय खरेदी किंमत (4) वितरण किंमत

__________ is the price fixed by the central government to protect the producer - farmers against excessive fall in price during bumper production years.

(1) Minimum support price (2) Statutory minimum price
(3) Procurement price (4) Issue price

---

97. 31 मार्च, 2013 अखेरीस महाराष्ट्रात __________ मुख्य नियमित बाजारपेठा व __________ दुय्यम बाजारपेठा अस्तित्वात होत्या.

(1) 278, 577 (2) 327, 826 (3) 228, 623 (4) 305, 603

In Maharashtra on 31st March, 2013 there were __________ APMCs with main market and __________ sub market.

(1) 278, 577 (2) 327, 826 (3) 228, 623 (4) 305, 603

---

98. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद __________ रोजी अस्तित्वात आली असुन पुणे येथे मुख्यालय आहे.

(1) 1974 (2) 1984 (3) 1994 (4) 1986

Maharashtra Agricultural Education and Research Council came into existence in the year __________ with headquarter at Pune.

(1) 1974 (2) 1984 (3) 1994 (4) 1986

---

99. भारतामध्ये पुढीलपैकी कोणत्या क्रांतीमुळे अन्नधान्यामध्ये स्वयंपूर्णता तसेच जादा उत्पादन झाले ?

(1) पीत क्रांती (2) श्वेत क्रांती
(3) हरित क्रांती (4) नील क्रांती

Which of the following revolution has resulted in self-sufficiency and surplus of food-grains in India ?

(1) Yellow revolution (2) White revolution
(3) Green revolution (4) Blue revolution

---

100. मध्यान्ह आहार योजनेअंतर्गत प्राथमिक शाळेच्या पोषण आहारामध्ये __________ कॅलरीज अपेक्षित आहेत.

(1) 320 (2) 470 (3) 450 (4) 385

In mid-day meal programme, primary school calorie intake should be __________ cal.

(1) 320 (2) 470 (3) 450 (4) 385

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

101. शरीराकरिता आवश्यक असणाऱ्या उष्मांक (कॅलरी) गरजेचा अंदाज घेण्यासाठी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे :

(a) शारीरिक हालचाली (b) शरीराची ठेवण (सौष्ठव)

(c) कुपोषण (d) हवामान व वातावरण

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (c), (d) विधाने योग्य आहेत

(2) केवळ (a) विधान योग्य आहे

(3) (a), (b), (c) विधाने योग्य आहेत

(4) (a), (b), (c), (d) विधाने योग्य आहेत

In estimating calorie requirement following factors are taken into account :

(a) Physical activity (b) Body size composition

(c) Malnutrition (d) Climate and environment

**Answer options :**

(1) (a), (c), (d) Statements are correct

(2) Only (a) Statement is correct

(3) (a), (b) and (c) Statements are correct

(4) All (a), (b), (c), (d) Statements are correct

---

102. "राष्ट्रीय पतपुरवठा परिषदेच्या" अभ्यास मंडळाच्या शिफारशीनुसार आक्टोबर, 1969 मध्ये "अग्रणी बँक योजना" सुरू करण्यात आली. या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष __________ हे होते.

(a) प्रा. डी.आर. गाडगीळ (b) श्री. शिवरामन

(c) श्री. नरसिंह (d) श्री. ए.एम. खुसरो

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) विधान योग्य आहे (2) (b) विधान योग्य आहे

(3) (c) विधान योग्य आहे (4) (d) विधान योग्य आहे

The "Lead Bank Scheme" was launched on the recommendations of the study group appointed by "National Credit Council" in October, 1969 under the Chairmanship of :

(a) Prof. D.R. Gadgil (b) Mr. Shivaraman

(c) Mr. Narsimha (d) Mr. A.M. Khusro

**Answer options :**

(1) (a) Statement is correct (2) (b) Statement is correct

(3) (c) Statement is correct (4) (d) Statement is correct

---

103. जमिनीची होणारी धूप हे जमिनीच्या कमी उत्पादकतेचे एक कारण आहे. यामुळे वार्षिक सरासरी __________ पोषणद्रव्ये नष्ट होतात.

(1) 5.0 ते 8.0 दशलक्ष टन
(2) 5.4 ते 8.4 दशलक्ष टन
(3) 6.4 ते 8.5 दशलक्ष टन
(4) 8.0 ते 10.0 दशलक्ष टन

Soil erosion is one of the reasons for low productivity of land. The annual average loss of nutrients from soil due to soil erosion is __________.

(1) 5.0 to 8.0 million tonnes
(2) 5.4 to 8.4 million tonnes
(3) 6.4 to 8.5 million tonnes
(4) 8.0 to 10.0 million tonnes

---

104. उच्च रक्तदाब थांबण्यासाठी आहाराच्या दृष्टीकोनातुन (DASH) __________ असे असावे.

(1) मिठाचे सेवन कमी
(2) मिठाचे सेवन जास्त
(3) साखरेचे सेवन कमी
(4) साखरेचे सेवन जास्त

The Dietary Approaches to Stop Hypertension (DASH) are __________ diet.

(1) Low Salt intake
(2) Hyper Salt intake
(3) Low Sugar intake
(4) Hyper Sugar intake

---

105. ग्रामीण पतपुरवठ्याचा आढावा घेण्याच्या उद्देश्याने भारत सरकारने सन 1989 साली "कृषि पतपुरवठा आढावा समितीची" (Agricultural Credit Review Committee) स्थापना केली. या समितीचे अध्यक्ष __________ होते.

(1) एस.बी. वेंकटपय्या
(2) ए.एम. खुसरो
(3) डी.आर. गाडगीळ
(4) वरीलपैकी कोणीही नाही

To take the review of rural credit, Government of India has appointed "Agricultural Credit Review Committee" in the year 1989 under the Chairmanship of :

(1) S.B. Venkatappiah
(2) A.M. Khusro
(3) D.R. Gadgil
(4) None of the above

---

106. __________ हे एकमेव असे सेंट्रल नर्व्हस सिस्टीमला शक्ती देण्याचे काम करते.

(1) मोनोसॅकराइड
(2) ग्लुकोज
(3) ग्लायकोजन
(4) स्पेयर प्रथीन (अतिरिक्त प्रथिन)

__________ alone can work as a source of energy for central nervous system.

(1) Monosaccharide
(2) Glucose
(3) Glycogen
(4) Spare proteins

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

107. सिंचनाला खालील पंचवार्षिक योजनेत सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले :

(1) प्रथम पंचवार्षिक योजना (2) द्वितीय पंचवार्षिक योजना

(3) तृतीय पंचवार्षिक योजना (4) वरील सर्व पर्याय

Irrigation was given the highest priority in ________ .

(1) First five year plan (2) Second five year plan

(3) Third five year plan (4) All the above

---

108. 'मृदा आरोग्य पत्रिका' (SHC) योजना भारत सरकारने सुरू केली असुन 2016 च्या केंद्रीय अर्थसंकल्पात ₹ ________ एवढी तरतुद करण्यात आली आहे.

(1) 400 करोड (2) 468 करोड

(3) 500 करोड (4) 568 करोड

'Soil Health Card' is a scheme launched by Govt. of India with allocation of ₹ ________ in 2016 union budget.

(1) 400 Cr. (2) 468 Cr.

(3) 500 Cr. (4) 568 Cr.

---

109. आर्थिक समावेशकता समस्या हाताळण्यासाठी भारत सरकारने "आर्थिक समावेश समिती" (Financial Inclusion Committee) ________ यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली.

(1) डॉ. सी. रंगराजन (2) प्रा. डी.आर. गाडगीळ

(3) श्री. एम. नरसिंहन (4) ए.एम. खुसरो

In order to address the issues of financial inclusion, the Government of India constituted a "Committee on Financial Inclusion" under the Chairmanship of ________ .

(1) Dr. C. Rangarajan (2) Prof. D.R. Gadgil

(3) Shri. M. Narasimhan (4) A.M. Khusro

---

110. आर्थिक बाबी संदर्भातील कॅबिनेट समितीने ________ काळात कृषि विस्तार आणि तंत्रज्ञान (NMAET) वर राष्ट्रीय मिशन अंमलबजावणीस मान्यता दिली आहे.

(1) 9 वी पंचवार्षिक योजनेच्या (2) 10 वी पंचवार्षिक योजनेच्या

(3) 11 वी पंचवार्षिक योजनेच्या (4) 12 वी पंचवार्षिक योजनेच्या

The Cabinet Committee on Economic Affairs has approved the implementation of the National Mission on Agricultural Extension and Technology (NMAET) during ________ period.

(1) 9th five year plan (2) 10th five year plan

(3) 11th five year plan (4) 12th five year plan

---

111. भारतामध्ये 'जडपाणी' ह्या प्रक्रियेतून तयार केले जाते :

(1) अमोनिया - हायड्रोजन विनिमय प्रक्रिया

(2) हायड्रोजन सल्फाईड - पाणी विनिमय प्रक्रिया

(3) वरील दोन्ही प्रक्रियेद्वारे

(4) भारतामध्ये 'जडपाणी' तयार करण्याचे प्रकल्प नाहीत

India produces 'heavy water' by the reactions :

(1) ammonia - hydrogen exchange reaction

(2) hydrogen sulphide - water exchange reaction

(3) both the above

(4) In India, we don't have any heavy water plants.

---

112. भारताने खालीलपैकी कोणती 'इंडियन रिजनल नेव्हीगेशन सॅटेलाइट सिस्टीम' नुकतेच 28 एप्रिल, 2016 ला प्रक्षेपित करून जी.पी.एस. क्लब मध्ये प्रवेश केला ?

(1) आय.आर.एन.एस.एस. - 1 जी. (2) आय.आर.एन.एस.एस. - 1 एच.

(3) आय.आर.एन.एस.एस. - 1 के. (4) आय.आर.एन.एस.एस. - 1 एफ.

India entered GPS Club by launching which of the following 'Indian Regional Navigation Satellite System' recently on 28 April, 2016 ?

(1) IRNSS - 1 G (2) IRNSS - 1 H

(3) IRNSS - 1 K (4) IRNSS - 1 F

---

113. पवन उर्जा आणि पवन गती या मधील गणिती संबंध काय आहे ?

(1) (पवन उर्जा) $\propto$ (पवन गती)

(2) (पवन उर्जा) $\propto$ (पवन गती)$^{1/2}$

(3) (पवन उर्जा) $\propto$ (पवन गती)$^{2}$

(4) (पवन उर्जा) $\propto$ (पवन गती)$^{3}$

What is the mathematical relation between wind power and wind velocity ?

(1) (wind power) $\propto$ (wind velocity)

(2) (wind power) $\propto$ (wind velocity)$^{1/2}$

(3) (wind power) $\propto$ (wind velocity)$^{2}$

(4) (wind power) $\propto$ (wind velocity)$^{3}$

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

**114.** इसरो, 2019 - 20 मध्ये मिशन 'आदित्य - 1' ही योजना ________ या कार्यासाठी करीत आहे.

(1) आपत्ती व्यवस्थापना

(2) जास्तीत जास्त दूरसंचार वाहिण्या उपलब्ध करणे व टिव्ही/रेडीओ प्रसारणासाठी सोई उपलब्ध करणे.

(3) गतीशील सौर कोरोना चा अभ्यास

(4) दहशतवाद्यांच्या स्थळांच्या माहीतीसाठी

ISRO plans to carry out the mission "Aditya - 1" in 2019 - 20 for :

(1) the disaster management

(2) providing more Telecom lines and Television/Radio broadcasting facilities

(3) the study of dynamic Solar Corona

(4) the identification of militant's sites

---

**115.** उर्जा दक्षता विभाग (BEE) खालीलपैकी कोणत्या पर्यायासंबंधात कार्य करते ?

(1) उर्जा क्षेत्राशी निगडीत संशोधनाकरिता पायाभूत सुविधा उपलब्ध करणे.

(2) उर्जेचे प्रेषण व वितरण प्रणाली सुधारणेबाबत.

(3) भारतीय अर्थव्यवस्थेवरचा बोझा कमी करण्यासाठी योग्य पद्धतीने उर्जेच्या वापरासाठी धोरणे व उपाययोजना तयार करणे.

(4) उर्जा क्षेत्राशी निगडीत प्रकल्पांसाठी आर्थिक सुविधा उपलब्ध करणे.

The Bureau of Energy Efficiency (BEE) works for the mission of :

(1) Creating infrastructure to carry out research in the field of power sector.

(2) Improvement of transmission and distribution system of power.

(3) Developing policies and strategies for proper utilization of energy, to reduce pressure on the Indian economy.

(4) Providing term-finance to projects in the power-sector field.

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

116. 'इसरो' ची महत्वाची केंद्रे व स्थळे खाली दिलेली आहेत. त्यापैकी एक जोडी चुकीची आहे, ती ओळखा.

(1) विक्रम साराभाई स्पेस सेंटर - थिरुवनंथपुरम

(2) स्पेस अप्लीकेशन सेंटर - बेंगलूरु

(3) सतिश धवन स्पेस सेंटर - श्रीहरीकोटा

(4) इसरो प्रोपुल्शन सेंटर - महेंद्रगिरी

Some important centres of ISRO and places are given below. Of these, one is wrong. Identify the pair.

(1) Vikram Sarabhai Space Centre - Thiruvananthapuram

(2) Space Application Centre - Bengaluru

(3) Satish Dhawan Space Centre - Shriharikota

(4) ISRO Propulsion Centre - Mahendragiri

---

117. बायोमासचा उर्जास्रोत म्हणुन उपयोगितेवर प्रभाव पाडणारे खालीलपैकी कोणते घटक आहे ?

(1) भौतिक घटक (2) तंत्रज्ञानाचा घटक

(3) पर्यावरणाचा घटक (4) वरील सर्व

Which of the following factor influences utilization of Bio-mass as a source of energy ?

(1) Material factor (2) Technological factor

(3) Environmental factor (4) All of the above

---

118. बॉयोगॅस मध्ये कुठला वायु हा विपुल प्रमाणात असतो ?

(1) मिथेन ($CH_4$) (2) कार्बनडायऑक्साईड ($CO_2$)

(3) हायड्रोजन ($H_2$) (4) हायड्रोजन सल्फाईड ($H_2S$)

Which gas is dominant in the Bio-gas plant ?

(1) Methane ($CH_4$) (2) Carbondioxide ($CO_2$)

(3) Hydrogen ($H_2$) (4) Hydrogen Sulphide ($H_2S$)

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

119. ${}^{A}_{Z}X$ दर्शविलेल्या अणुकेंद्र (न्युक्लिअस) मध्ये ________ असतात.

(1) A - Z प्रोटॉन्स व Z न्युट्रॉन्स
(2) A प्रोटॉन्स व A - Z न्युट्रॉन्स
(3) A - Z प्रोटॉन्स व A न्युट्रॉन्स
(4) Z प्रोटॉन्स व A - Z न्युट्रॉन्स

A nucleus designated by ${}^{A}_{Z}X$ contains ________ .

(1) A - Z protons and Z neutrons
(2) A protons and A - Z neutrons
(3) A - Z protons and A neutrons
(4) Z protons and A - Z neutrons

---

120. खालीलपैकी कोणता भारतीय उपग्रह हा विद्यार्थी उपग्रह नाही ?

(1) सरल (2) अनुसॅट (3) युथसॅट (4) एसआरएमसॅट

Which of the following Indian satellite is not a student satellite ?

(1) SARAL (2) ANUSAT (3) YOUTHSAT (4) SRMSAT

---

121. पेटी प्रकाराच्या सौर कुकरमधील पाण्याचे प्रमाण कमी केले असता त्याच्या उत्कलनांका पर्यंत पोहचण्यासाठी लागणारा वेळ हा :

(1) वाढतो
(2) तेवढाच राहतो
(3) कमी होतो
(4) यापैकी एकही नाही

In the box type Solar Cooker, if the water amount is reduced then the time required to reach the boiling point will :

(1) increase
(2) remain same
(3) reduce
(4) none of these

---

122. खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यात नविकरण योग्य उर्जा केंद्रे जसे 'सौर तलाव', आशियातील प्रथम पवनचक्की व आशियातील प्रथम 'भरतीचे उर्जा प्रकल्प' आहेत ?

(1) थिरुवनंथपुरम
(2) विशाखापट्टनम
(3) तिरुचिरापल्ली
(4) कच्छ

In which district the important projects of renewable energy such as, 'Solar pond', Asia's first wind farm and Asia's first tidal project are located ?

(1) Thiruvananthapuram
(2) Vishakhapatnam
(3) Tiruchirapalli
(4) Kutch

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

123. भारतातील अपारंपरिक उर्जास्रोत खात्याची स्थापना केव्हा झाली ?

(1) 1980 (2) 1982 (3) 1985 (4) 1970

In India, the department of non-conventional energy sources was set up in the year ________ .

(1) 1980 (2) 1982 (3) 1985 (4) 1970

---

124. भारतातील राष्ट्रीय सुदूर संवेदन केंद्राची (NRSA) स्थापना झालेले ठिकाण कोणते ?

(1) नवी दिल्ली (2) बेंगलूरु (3) हैदराबाद (4) मुंबई

In India, the National Remote Sensing Agency (NRSA) was set up at ________ .

(1) New Delhi (2) Bengaluru (3) Hyderabad (4) Mumbai

---

125. दृष्टीपथ 2020 मध्ये अण्विक उर्जा खालाचे शक्य असणारे साखळी उपक्रम :

(1) तीन 500 MWe FBRs (2) चार 500 MWe FBRs

(3) पाच 500 MWe FBRs (4) सहा 500 MWe FBRs

In VISION 2020 the Department of Atomic Energy envisages a series of :

(1) Three 500 MWe FBRs (2) Four 500 MWe FBRs

(3) Five 500 MWe FBRs (4) Six 500 MWe FBRs

---

126. शरीर क्रिया शास्त्र याचे इ.स. 2010 चे नोबेल पारितोषक ________ यांना 'प्रयोगशाळेत मानवी फलन प्रक्रिया विकसित करणे' ह्या साठी देण्यात आले.

(1) विल्लीयम् कँपबेल (2) राल्फ स्टाईनमॅन

(3) रॉबर्ट एडवर्डस् (4) अँड्र्यु झेड. फायर

________ was awarded the 2010 Noble Prize in physiology for 'development of human in vitro fertilization therapy'.

(1) William Campbell (2) Ralph Steinman

(3) Robert Edwards (4) Andrew Z. Fire

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

127. ________ हा क्लास A चा डीफॉल्ट सबनेट मास्क आहे.

(1) 255.0.0.0 (2) 255.255.0.0

(3) 255.255.255.0 (4) 255.255.255.255

________ is a default subnet mask for a class A.

(1) 255.0.0.0 (2) 255.255.0.0

(3) 255.255.255.0 (4) 255.255.255.255

---

128. आय.सी.एम.पी. (ICMP) चा प्रामुख्याने उपयोग ________ होय.

(1) एरर आणि डायग्नोसिस फंक्शन (2) अॅड्रेसिंग

(3) फॉरवर्डींग (4) वरीलपैकी एकही नाही

ICMP is primarily used for ________ .

(1) error and diagnosis functions (2) addressing

(3) forwarding (4) none of the above

---

129. ADSL चे पूर्ण विस्तारीत रूप ________ आहे.

(1) Asymmetric Digital Subscriber Line

(2) Asynchronous Digital Subscriber Line

(3) Asynchronous Digital Serial Line

(4) Asymmetric Digital Serial Line

ADSL stands for ________ .

(1) Asymmetric Digital Subscriber Line

(2) Asynchronous Digital Subscriber Line

(3) Asynchronous Digital Serial Line

(4) Asymmetric Digital Serial Line

---

130. होस्टनेम ला आय.पी.अॅड्रेस मध्ये रूपांतरीत करणे हे काम खालीलपैकी कोण करते ?

(1) डी.एन.एस. सर्व्हर (2) हब (3) डी.एच.सी.पी. सर्व्हर (4) फायर वॉल

Which of the following device translates hostnames into IP addresses ?

(1) DNS server (2) Hub (3) DHCP server (4) Firewall

---

131. पुढीलपैकी कोणता पर्याय हरित खत पीके या सदरात मोडत नाहीत ?

(1) सौर-भांग (2) अॅझरीडिक्टा इंडिका

(3) घेवडा (4) सेसबॅनिया रोस्ट्राटा

Which of the following is **not** included as green manure crop ?

(1) Sun - hemp (2) Azaridicta Indica

(3) Cluster beans (4) Sesbania rostrata

---

132. पुढे दिलेल्या विकल्पांपैकी कोणत्या जैव विषाचा सूक्ष्म जैविकापासून उगम होत **नाही** ?

(1) अफला विष (2) बॉट्युलिन्म विष

(3) रायसीन (4) फ्युमोनीसीन

Which of the following is **not** of Microbial origin ?

(1) Aflatoxin (2) Botulinum toxin

(3) Ricin (4) Fumonicin

---

133. मानवी ऊती प्लासमिनोजेन सक्रियकाचे उत्पादनासाठी उंदरांचा उपयोग, मानवी इंटरल्युकिन - 2 याचे उत्पादनासाठी सशांचा उपयोग ही ________ याचे उदाहरण आहेत.

(1) प्रयोगशाळेतील प्रतिकरण (2) फार्मिंग

(3) प्रतिरोपण (4) पुन:संयोजी आर.एन.ए. तंत्रज्ञान

Use of mice for production of human tissue plasminogen activator and use of rabbits for production of human interleukin-2 are examples of ________ .

(1) In vitro replication (2) Pharming

(3) Transplantation (4) Recombinant RNA technology

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

134. पुढील औषध/औषधीं पैकी कोणती औषध/औषधे सी.एस.आय.आर प्रयोगशाळेने देशांतर्गत विकसित केली आहेत ?

(a) रिसोराइन (b) ॲक्यरेटीक

(c) मेमरी शुअर (d) बेनीफीक्स

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (c) (2) (b) आणि (d) (3) फक्त (b) (4) (a) आणि (d)

Which of the following drug/drugs have been indigenously developed by CSIR laboratories ?

(a) Risorine (b) Acuretic

(c) Memory sure (d) Benefix

**Answer options :**

(1) (a) and (c) (2) (b) and (d) (3) Only (b) (4) (a) and (d)

135. पुढीलपैकी सर्वात योग्य पर्याय निवडा :

लिंग ठरविण्याची मानवी पद्धत ही __________ अनुसरितात.

(1) पुष्पी पादप आणि मुक्तसंचारी प्राणी

(2) पक्षी त्याचप्रमाणे पतंग आणि फुलपाखरे

(3) पक्षी त्याचप्रमाणे पुष्पी पादप

(4) पक्षी आणि पतंग

Choose the most appropriate option from the following :

The human pattern of sex determination is followed by :

(1) flowering plants and free ranging animals

(2) birds, moths and butterflies

(3) birds as well as flowering plants

(4) birds and moths

136. वाणिज्यिक उत्पादन, विक्री व मानवी खाद्य या करिता यु.एस.एफ.डी.ए. ने सन 2015 मध्ये ________ ला पहिला जीन परिवर्तित प्राणी म्हणून मान्यता दिली.

(1) ट्युना (2) सॅमन (3) झिब्रा मत्स्य (4) तिलापिया

________ was one of the first genetically modified animal to be approved for commercial production, sale and human consumption by USFDA in 2015.

(1) Tuna (2) Salmon (3) Zebra fish (4) Tilapia

---

137. नायट्रोजनचे स्थिरीकरण करणारा ________ हा शेंग वर्गीय नसणाऱ्या झाडांसोबत परस्पर सहकार्यात आढळतो.

(1) रायझोबीयम्
(2) ॲझोमोनास
(3) फ्रँकिया
(4) क्लॉस्ट्रीडीयम्

________ is associated symbiotically with non-leguminous plants and is known to fix nitrogen.

(1) Rhizobium
(2) Azomonas
(3) Frankia
(4) Clostridium

---

138. गोठणविरोधी व अँटीऑक्सीडंट गुणधर्मासाठी माहित असणारे सेरीसीन हे ________ या व्यतिरिक्त काहीही नाही.

(1) सेराशीया स्पीसीज पासून मिळणारे बायोॲक्टीव्ह
(2) सॅलिसिलीक आम्लाचा डेरिव्हेटीव्ह
(3) रेशीमकृमींपासून मिळणारे प्रथिन
(4) स्पेक्टरीनचा डेरिव्हेटीव्ह

Sericin that is known to have antioxidant as well as antifrosting properties is nothing but ________ .

(1) A bioactive from serratia species
(2) A derivative of salicylic acid
(3) A protein from silkworm
(4) A derivative of spectrin

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**139.** रॉकफोर्ट चिज बनविण्याकरिता खालीलपैकी कोणत्या प्रकारच्या बुरशीचा वापर केला जातो ?

(1) ॲस्परजिलस स्पीशीज (2) सुडोमोनास स्पीशीज

(3) पेनेसिलियम स्पीशीज (4) कॅन्डीडा स्पीशीज

Which of the following fungus is used in preparation of Roquefort cheese ?

(1) Aspergillus species (2) Pseudomonas species

(3) Penicillium species (4) Candida species

---

**140.** एन्.बी.एफ.जी.आर.चे पेनींन्शुलर व मरीन फीश जेनेटीक रिसोरसेस केंद्र हे ________ येथे स्थित आहे.

(1) कोची (2) मुंबई (3) दिल्ली (4) लखनऊ

The Peninsular and Marine Fish Genetic Resources center (PMFGR) of the NBFGR is housed in ________ .

(1) Kochi (2) Mumbai (3) Delhi (4) Lucknow

---

**141.** प्रयोगशाळेत चांगल्या प्रकारे प्रथमत: ज्या मानवी पेशी वाढविल्यात त्या ________ पासून मिळविल्या.

(1) ग्रीवा कर्करोग (2) लिम्फोमा (3) मानवी गर्भ (4) श्वेतपेशी कर्करोग

Cells derived from ________ were the first human cells to grow well in the laboratory.

(1) Cervical cancer (2) Lymphoma (3) Human foetus (4) Leukaemia

---

**142.** दिलेले वाक्य पूर्ण करा :

नवापूरची तुर डाळ, सोलापूरी डाळींब, वाईगांवची हळद ________ .

(1) ही सर्व जनुकियरित्या सुधारीत पिकांची उदाहरणे आहेत

(2) ही सर्व भौगोलिक उपदर्शन रजिस्ट्रीचा भाग आहे

(3) ह्या सर्व किटक-प्रतिरोधी जाती आहेत

(4) ह्या सर्वांमध्ये अ जीवनसत्व मुबलक प्रमाणात असते

Complete the following statement :

Navapur turdal, Solapur pomegranate, Waigaon turmeric ________ .

(1) are all examples of genetically modified crops

(2) all form a part of Geographical indication registry

(3) all are pest resistant varieties

(4) all are rich sources of Vit. A

---

**143.** नोबेल पारितोषक विजेते, इन्सुलीनचे संशोधक सर फ्रेड्रीक बँटींग ह्यांनी इ.स. 1940 मध्ये संयुक्त हमी देणाऱ्यांच्या सहकाऱ्यांने प्रथम ________ संशोधन केंद्र स्थापन केले.

(1) संजीन विषयक (2) प्रयोगशाळेत फलनचे

(3) अंत:स्राव शास्त्रीय (4) खाजगी जैविक शस्त्र

Sir Fredrick Banting, the Nobel-Prize winning discoverer of insulin, established the first ________ research centre in 1940, with the help of corporate sponsors.

(1) Genomic (2) In vitro fertilization

(3) Endocrinology (4) Private biological weapon

---

**144.** विधान पूर्ण करा :

सेलेनेट, आर्सेनेट व गंधक ________ .

(1) हे आवर्ती सारणीच्या गट 3 मधील मूलद्रव्ये आहेत

(2) त्यांच्यात अंतंस्थ उत्प्रेरणीय क्रियाशीलता आहे

(3) यांचा अंत्य इलेक्ट्रॉन स्वीकारी सूक्ष्मजीव म्हणून उपयोग होऊ शकतो

(4) हे सूक्ष्मजैविक पेशीय पटलांचा एक घटक आहे

Complete the statement :

Selenate, Arsenate and Sulphur ________ .

(1) are group III elements in the periodic table

(2) have intrinsic catalytic activity

(3) can be used by microorganisms as terminal electron acceptors

(4) are a part of microbial cell membrane

---

145. अॅग्रोबॅक्टेरीयम् ट्युमाफेसिन्स या ________ .

(1) ग्रॅम पॉझिटिव्ह मृदाजीवांणूमुळे द्वीबीजपत्रींमध्ये क्राऊन गॉल रोग होतो

(2) ग्रॅम पॉझिटिव्ह मृदाजीवांणूमुळे एकबीजपत्रींमध्ये क्राऊन गॉल रोग होतो

(3) ग्रॅम निगेटिव्ह मृदाजीवांणूमुळे द्वीबीजपत्रींमध्ये क्राऊन गॉल रोग होतो

(4) ग्रॅम निगेटिव्ह मृदाजीवांणूमुळे एकबीजपत्रींमध्ये क्राऊन गॉल रोग होतो

Agrobacterium tumafaceins is a ________ .

(1) Gram positive soil bacterium causing crown gall disease in dicots

(2) Gram positive soil bacterium causing crown gall disease in monocots

(3) Gram negative soil bacterium causing crown gall disease in dicots

(4) Gram negative soil bacterium causing crown gall disease in monocots

---

146. 'विहार तळे' भागातून उगम पावून दक्षिणेकडे वाहत जाणाऱ्या मिठी नदी (मुंबई) ची एकूण भौगोलिक लांबी ही सुमारे ________ आहे.

(1) 13.5 कि.मी. (2) 23.5 कि.मी. (3) 33.5 कि.मी. (4) 43.5 कि.मी.

Mithi River (Mumbai) originates in the Vihar Lake Area, flows southwards, has a total geographical length of about ________ .

(1) 13.5 km (2) 23.5 km (3) 33.5 km (4) 43.5 km

---

147. IPCC च्या अहवालानुसार जागतिक पातळीवर हरित गृह वायु निर्मीतीकरिता कारणीभूत असलेल्या मानवनिर्मीत स्रोतांची सूची खाली दिली आहे.

या सूचीतील स्रोतांचा क्रम उत्सर्जन चढत्या क्रमाने लावा

(a) जीवाश्म इंधनाचा वापर ($CO_2$)

(b) पाणथळ जमीनीत, भात शेती ($CH_4$)

(c) सीमेंट निर्मिती ($CO_2$)

(d) जंगलतोड, जीववस्तुमान क्षय ($CO_2$)

**पर्यायी उत्तरे :**

(1) (c), (b), (d), (a) (2) (a), (c), (b), (d)

(3) (d), (c), (a), (b) (4) (c), (a), (d), (b)

Listed below are the sources of global emission of green house gases from anthropogenic sources (IPCC Report).

Rank these sources in increasing order of emission percentage.

(a) Burning of fossil fuels ($CO_2$)

(b) Wetland, Rice Cultivation ($CH_4$)

(c) Cement production ($CO_2$)

(d) Deforestation, decay of biomass ($CO_2$)

**Answer options :**

(1) (c), (b), (d), (a) (2) (a), (c), (b), (d)

(3) (d), (c), (a), (b) (4) (c), (a), (d), (b)

---

148. _________ मधे भूघसरणाप्रमाणेच मोठ्या प्रमाणात बर्फ, हिमवर्षाव आणि खडकांचे मोठे धोंडे पर्वता वरून वेगाने खाली घसरतात.

(1) सोल्फाटरा (2) हिमोढ (3) अवधान (4) जलकृपण

_________ is similar in mechanism to Landslide involve a large amount of ice, snow and rock falling quickly down the mountain.

(1) Solfatara (2) Moraine (3) Avalanche (4) Aquiclude

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

149. बंडा अचेह भूकंप (सुमात्रा, इंडोनेशिया) या विषयी दिलेली विधाने वाचा आणि **योग्य** पर्याय निवडा.

(a) भूकंपाची तीव्रता 9.0 एवढी रिस्टर प्रमाणावर नोंदविली गेली.

(b) यामुळे इंडोनेशिया आणि हिंदी महासागरातील इतर 11 देशांच्या किनारपट्टीवरील जनजीवन विष्कळीत झाले.

(c) भूकंपाच्या दिवशी पृथ्वीच्या कवचास 8 मिनिटे कंप जाणवला.

(d) हा भूकंप 28 डिसेंबर, 2004 रोजी घडला.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ विधान (a) आणि (b) बरोबर आहेत

(2) केवळ विधान (b) आणि (c) बरोबर आहेत

(3) केवळ विधान (a), (b) आणि (c) बरोबर आहेत

(4) सर्व विधाने बरोबर आहेत

Read the given statements about Banda Aceh Earthquake (Sumatra, Indonesia) and choose the **correct** option.

(a) The earthquake measured 9.0 on the Richter Scale.

(b) It devastated coastal communities in Indonesia and all 11 other countries in the Indian Ocean.

(c) The boxing day earthquake shook the earth's crust for eight minutes.

(d) An earthquake occurred on 28 December, 2004.

**Answer options :**

(1) Only statements (a) and (b) are correct

(2) Only statements (b) and (c) are correct

(3) Only statements (a), (b) and (c) are correct

(4) All statements are correct

150. खालीलपैकी कोणत्या कारणामुळे भूघसरण क्रिया घडते ?

(a) जंगलतोड

(b) ज्वालामुखीचा उद्रेक

(c) अतिवृष्टीमुळे उतारावरील पृष्ठभागाची झीज

(d) वरीलपैकी सर्व

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (d) (3) (a) आणि (b) (4) (a) आणि (c)

Landslides occur due to :

(a) Deforestation

(b) Volcanic eruptions

(c) Weakening of slope by heavy rains

(d) All the above

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (d) (3) (a) and (b) (4) (a) and (c)

- o 0 o -

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्रश्न क्रमांक **201.** सतीची चाल नष्ट करण्यासीठी कोणी मूलत: प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव **खालीलप्रमाणे** प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-**क्रमांक** "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

SEAL